दैनिक
# समर्थ राजयोग
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -१२७ रविवार दि.११ जानेवारी २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-127 Sunday, Dt.11 January 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# मुख्यमंत्री म्हणून नव्हे तर गहिनीनाथ गडाचा एक सेवक म्हणून सर्व विकासकामांची जबाबदारी लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन पार पाडेल -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



## संत वामनभाऊ महाराज यांच्या ५० व्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त कळशारोपण कार्यक्रम जल्लोषात संपन्न











प्रतिनिधी @ बीड

समाजाला अध्यात्म, सदाचार आणि एकोप्याचा मार्ग दाखवणारे नाथ परंपरेतील महान संत वामनभाऊ महाराज यांचे विचार काळाच्या ओघातही अधिकच सुसंगत ठरत असून, त्यांचे कीर्तन, नामस्मरण आणि उपदेश पिढ्यान्पिढ्या समाजाला मार्गदर्शन करत राहतील, या गडाचा सर्वांगीण विकास मी मुख्यमंत्री म्हणून नव्हे तर एक सेवक म्हणून सर्व लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन करेल असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

संत वामनभाऊ महाराजांच्या ५० व्या, सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, गडाचे महंत विठ्ठल महाराज, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, आष्टीचे आमदार सुरेश धस, मा आ मोनिका राजळे,डॉ. योगेश क्षीरसागर, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, मा आ भीमराव धोंडे, विक्रमानंद शास्त्री, स्वामी विश्वेश्वरानंदजी महाराज आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संत वामनभाऊ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी आणि आशीर्वाद घेण्यासाठी मी येथे आलो आहे. हे निमंत्रण मुख्यमंत्र्याला नसून, संत वामनभाऊ महाराजांच्या एका भक्ताला आणि गहिनीनाथ गडाच्या सेवकाला विठ्ठल महाराजांनी दिलेले आहे, या भावनेतून मी येथे उपस्थित आहे.नाथ परंपरेतील महान संत आणि शंकराचा अवतार मानले जाणारे संत वामनभाऊ महाराज हे समाजाला दिशा देणारे सद् गुरु होते. दऱ्या-खोऱ्यांतून प्रवास करत त्यांनी भागवत पंथाचा प्रचार केला आणि समाजात एकोप्याचा संदेश दिला. मन शुद्ध असेल तर आचरण शुद्ध होते हा विचार त्यांनी समाजमनात रुजवला. त्यांच्या उपदेशामुळे चोरसुद्धा चोरी सोडून माळकरी झाले, ही त्यांची अलौकिक किमया होती, असे त्यांनी सांगितले.संत वामनभाऊ महाराजांना वाचासिद्धी होती, असे सांगितले जाते. त्यांच्या कीर्तनातून आणि विचारातून समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत अध्यात्म पोहोचले. कितीही पिढ्या बदलल्या तरी त्यांचे कीर्तन, नामस्मरण आणि उपदेश आजही तितकेच महत्त्वाचे आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.प्रसाद वितरणाची परंपरा हे संत वामनभाऊ महाराजांचे मोठे वैशिष्ट्य असून, जिथे-जिथे सप्ताह होतो तिथे भाविकांसाठी पोटभर जेवणाची व्यवस्था केली जाते. पुढील सप्ताहासाठी विविध गावांतून मोठ्या प्रमाणावर मागणी असणे ही संत वामनभाऊ महाराजांच्या कृपेची साक्ष असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी शासनाच्या योजनेअंतर्गत विविध कामे हाती घेण्यात आली असून ती टप्प्याटप्प्याने पूर्ण होत आहेत. पंढरपूर येथे आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यात आली असून, पालखी मार्गाच्या विकासासाठीही लवकरच काम करण्यात येईल, असे आश्वासन देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, मुख्यमंत्री म्हणून नव्हे तर गहिनीनाथ गडाचा एक अनुयायी म्हणून येथील सर्व विकासकामांची जबाबदारी लोकप्रतिनिधींसह मिळून पार पाडली जाईल. दरवर्षी संधी मिळेल तेव्हा गहिनीनाथ गडावर येऊन संत वामनभाऊ महाराजांचा आशीर्वाद घेत राहीन, असे मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, संत वामनभाऊ महाराजांनी कठीण काळात माणसाला माणूस बनवण्याचे संस्कार समाजाला दिले. सत्य, एकोपे आणि सेवाभावाचे हे संस्कार आजही महाराष्ट्रभर जिवंत आहेत. कष्टकरी, गरीब आणि वंचित समाज वामनभाऊ महाराजांचे विचार विसरलेला नाही.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून गहिनीनाथ गडाच्या विकासाला भव्य स्वरूप मिळत असून, हे कार्य भाविकांच्या श्रद्धेला साजेसे ठरत आहे. सामान्य माणसाच्या श्रद्धास्थानांच्या विकासासाठी केलेले हे कार्य निश्चितच लोकांचा आशीर्वाद मिळवून देणारे आहे असा उल्लेख त्यांनी केला.

### लेकीच्या पदरात मुख्यमंत्र्यांनी साखर टाकली..!

गहिनीनाथगडाचा विकास आणि गहिनीनाथगडाची लेक म्हणून असलेल्या नात्याचा संदर्भाने बोलतांना ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीला आपल्या वडिलांना गोड धोड खाऊ घालायची इच्छा असते, त्यासाठी ती मूठभर गहू, मूठभर तांदूळ आपल्या पदरात घेऊन येते त्यात साखरेची कमी असते. ती साखर टाकण्याचे काम एक प्रकारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. त्यामुळे मी पालकमंत्री असताना गडाच्या भव्य विकासाचा घेतलेला ध्यास व माझी इच्छा पूर्णत्वास येत आहे. गहिनीनाथ गडाचा आज भव्य दिव्य विकास सुरू असून हे एकमेव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातूनच शक्य झाल्याचे ना. पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या.



गहिनीनाथ गड - वैराग्यमूर्ती संत वामन भाऊ यांच्या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त प्रतिवर्षीच्या परंपरेप्रमाणे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते व गडाचे महंत हभप विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत संत वामनभाऊ महाराजांच्या समाधीची महापूजा संपन्न झाली.मागील २५ वर्षांपासून धनंजय मुंडे यांना पुण्यतिथी सोहळ्याच्या महापुजेचा मान असून, वामनभाऊंच्या पुण्यतिथीचा सुवर्णमहोत्सव व धनंजय मुंडे यांच्या हस्ते पूजेचा रौप्यमहोत्सव पूर्ण झाला.यावेळी भक्तीमय वातावरणात महापूजा व आरती संपन्न झाली.

## पोटविकार व लिव्हर आजारांवरील उपचारासाठी
### प्रसिध्द डॉ. अक्षय कुलकर्णी यांची बीडमध्ये विशेष सेवा

प्रतिनिधी @ बीड

वाढत्या पोटविकारांच्या पार्श्वभूमीवर बीडमधील एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटलने नागरिकांच्या आरोग्यासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविला आहे. या उपक्रमांतर्गत प्रसिद्ध पोटविकार तज्ञ डॉ. अक्षय कुलकर्णी हे मंगळवार,१३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत रुग्ण तपासणीसाठी हॉस्पिटलमध्ये उपस्थित राहणार आहेत.या विशेष उपक्रमाचा उद्देश पोटविकारांचे लवकर निदान,पोटात किंवा छातीत जळजळ होणे, उलटी आणि संडासमध्ये रक्त पडणे कावीळ असल्यास, लिव्हर सिरोसीस किंवा लिव्हर संबंधी इतर कुठलाही आजार असल्यास ,हिपेटाईटीस बी किंवा हिपेटाईटीस सी चे संक्रमण झाले असल्यास, पित्ताशय किंवा पित्ताशयाच्या नलिकेमध्ये खडे असल्यास, गिळन्यास त्रास होत असल्यास तात्काळ उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत नागरिकांना प्रभावी मार्गदर्शन करणे हा आहे. रुग्णांनी तपासणीसाठी पूर्वनोंदणी करणे आवश्यक असून यात तज्ञांकडून सल्ला, तपासणी आणि योग्य उपचार पद्धतींबाबत मार्गदर्शन मिळणार आहे.

या संदर्भात, सय्यद हसीब सर यांनी एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटल(माने पेट्रोल पंपाच्या मागे, नर्सरी रोड, बीड) तर्फे सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या आरोग्याची काळजी घ्या आणि या संधीचा अवश्य लाभ घ्या.अधिक माहितीसाठी व पूर्वनोंदणीसाठी ९९२३०१०२०२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## बी.एड., एलएल.बी. साठी सीईटी नोंदणी सुरू

प्रतिनिधी @ बीड

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६- २ ७ साठी बी.एड.(जनरल व स्पेशल), बी.एड. (इलेक्टिव्ह ) तसेच ३ वर्षीय एलएल.बी. अभ्यासक्रमांच्या सीईटी प्रवेश नोंदणीस ८ जानेवारी २०२६ गुरुवारपासून सुरुवात झाली आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी २३ जानेवारी पर्यंत ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करता येणार आहे.

मुंबईतील राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने आतापर्यंत यमपीएड,एमएड, एमसीए, एम. एचएमसीटी, बी.एड.आणि ३ वर्षीय एलएल.बी. अशा सहा अभ्यासक्रमांच्या सीईटी नोंदणीस सुरुवात केली आहे. संभाव्य वेळापत्रकानुसार बी.एड. सीईटी २७ ते २९ मार्चला,तर एलएल.बी. साठीची परीक्षा १ ते २ एप्रिल रोजी घेण्यात येणार आहे. उर्वरित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सीईटी नोंदणीसही लवकरच प्रारंभ करण्यात येणार असल्याचे कक्षाने कळवले आहे. या अभ्यासक्रमांसाठीचा ऑनलाईन अर्ज सविस्तर माहिती पुस्तिका कक्षाच्या ु.ारहरलशीं.ीस.या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर संपर्क साधून बी.एड., एलएल.बी. साठी सीईटी नोंदणी करण्याचे आवाहन शिक्षण व करियर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

11 जानेवारी
माजी आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री
आदरणीय राजेश भैय्या टोपे साहेब
यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन !



मा.श्री.राजेशभैय्या टोपे
(माजी आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री)



स्व.अंकुशरावजी टोपे
(माजी खासदार)



सौ.मनिषाताई टोपे

वाढदिवसा निमित्त
भव्य अपूर्व विज्ञान मेळावा
दि.११ जानेवारी २०२६
स्थळ : मत्सोदरी विद्यालय, घु. हदगाव, ता.अंबड, जि.जालना
-: शुभेच्छूक :-



कल्याण नरसिंगराव सोळूंके (मुख्याध्यापक)
श्री.वाघमारे आर.के., श्री.बांगर बी.बी., श्री.शेख एम.आर., श्री.येटाळे एस.एम., श्री.कोटंबे डी.डी., श्री.पवार एन.एस., श्री.खराद टि.बी., श्री.गुरव आर.सी., श्री.नांद्रे एच.डी, श्री.लांडगे एस.एस., श्री.पटेकर एस.यु., श्री.काथार के.,, श्री.मरकड के.पी. (वरिष्ठ लिपिक), श्री.पांढरे आर.जी., श्री.बोराडे अे.एस.

संपादकीय....

# मुंबईचा 'वाली कोण'?

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका सुरू असल्या तरी सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष मुंबई महानगरपालिकेच्या सत्तेवर केंद्रित झाले आहे. 'मुंबईचे वाली आम्हीच' असा दावा करणाऱ्या राजकीय रणधुमाळीत मात्र मुंबईकरांचे खरे प्रश्न आणि अपेक्षा दुय्यम ठरत असल्याचे चित्र दिसत आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका सुरू असल्या तरी सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष मुंबई महानगरपालिकेच्या सत्तेवर केंद्रित झाले आहे. 'मुंबईचे वाली आम्हीच' असा दावा करणाऱ्या राजकीय रणधुमाळीत मात्र मुंबईकरांचे खरे प्रश्न आणि अपेक्षा दुय्यम ठरत असल्याचे चित्र दिसत आहे.

विधानसभा निवडणुकीतील विजय, नगरपरिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीतली विजयी घोडदौड महायुतीने कायम ठेवली आणि आताही महानगरपालिकेच्या निवडणुकीत काही ठिकाणी नगरसेवकांचा बिनविरोध विजय यामुळे भाजप व शिंदे सेनेच्या नेत्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात असून त्यासाठी फक्त ४ दिवस शिल्लक आहेत. भाजप व शिंदे सेनेच्या नेत्यांनी राज्यात प्रचारासाठी स्वतःला झोकून दिले. मात्र आता भाजप, शिंदे सेना, मनसे, ठाकरे सेनेने मुंबईकडे मोर्चा वळवला आहे. मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर ११ जानेवारीला ठाकरे बंधूंची फटकेबाजी, तर १२ जानेवारीला भाजप व शिंदे सेनेची जाहीर सभा होणार आहे. दोन्ही पक्षांच्या या सभांकडे राज्यातील जनतेचे लक्ष लागले आहे. ठाकरे बंधू कोणाचे वाभाडे काढणार, तर देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे कोणावर तोफगोळा डागणार याची उत्सुकता लागली आहे. मात्र मुंबईला व मुंबईकरांना अपेक्षित काय मिळणार याची शाश्वती कुठलाच नेता देणार नाही, हेही तितकेच खरे.

राजकारण अन् भ्रष्टाचार हे समीकरण तसं नवीन नाही. वाहत्या पाण्यात हात धुवून घ्या, अशी ओळख काही भ्रष्ट अधिकारी व राजकारण्यांची. राजकारणी म्हणजे दुसऱ्या देशातून आलेली व्यक्ती नव्हे, तर तुम्ही-आम्ही निवडून दिलेला हक्काचा लोकप्रतिनिधी. अगदी ग्रामपंचायत ते दिल्लीतील खासदार तुमच्या-आमच्या मतांवर निवडून आलेले लोकप्रतिनिधी असतात. मतदार राजाच्या समस्यांचे निवारण करणे ही माफक अपेक्षा लोकप्रतिनिधींकडून असते. निवडणुका जवळ आल्या की, हा लोकप्रतिनिधी आपल्या हक्काचा या विश्वासावर तुम्ही-आम्ही मतदान करतो. मात्र एकदा का आपला विश्वासू उमेदवार निवडून आला की, समाजकारण दूर होऊन तो राजकारणात गुंतला जातो. मतदार राजाने निवडून दिले म्हणून इथपर्यंत पोहोचलो याचा विसर लोकप्रतिनिधींना पडत असावा किंवा जाणूनबुजून दुर्लक्ष करत असावेत. मात्र ज्यांच्या मतांवर राजकीय प्रवासाची सुरुवात होते त्याच मतदार राजाचा विसर लोकप्रतिनिधींना पडतो, हे मतदार राजाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.

२० टक्के राजकारण अन् ८० टक्के समाजकारण हे वाक्य आता बदलत आहे. सध्याचे राजकारण हे जनतेसाठी कमी आणि स्वतःसाठी अधिक असे सुरू आहे. एखाद्या पक्षाने तिकीट नाकारले, पक्षात समाधानकारक पद मिळाले नाही तर थेट दुसऱ्या पक्षात उडी मारायची आणि मनासारखं करून घ्यायचं, असा राजकारणाचा पॅटर्न बदलत चाललाय. मतदार राजाने दिलेल्या मतालाही शून्य किंमत दिली जाते. महायुती असो वा महाविकास आघाडी, मनसे असो वा ठाकरे सेना किंवा अन्य पक्षाचे राजकारण हे अर्थपूर्ण राजकारणाच्या दिशेने सुरू असून जनतेच्या प्रश्नांना केराची टोपली दाखवली जाते. मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली राजकारण सुरू आहे. राजकारणात सर्वसामान्य जनतेच्या नशिबी खड्डेमय रस्ते, पिण्याच्या पाण्यासाठी वणवण, आरोग्य सेवा व्हेंटिलेटरवर या सगळ्याला कारणीभूत सध्या सुरू असलेले राजकारण. 'खुर्चीसाठी काय पण' असा राजकीय कारभार सुरू असून 'मुंबईला काय मिळाले' याचा विचार मतदार राजानेही करणे गरजेचे आहे.

आपल्या मतदारसंघातील समस्यांचे निवारण, पायाभूत सुविधा मिळणे याच मतदार राजाच्या माफक अपेक्षा. मात्र गेल्या काही वर्षांत राजकारणी मंडळींचे राजकारण त्यांच्याच अवतीभवती सुरू आहे. सत्तेत असो वा नसो एकमेकांची उणीदुणी काढणे यात राजकीय नेतेमंडळी धन्यता मानतात. निवडणुका जवळ आल्या की, मतदार राजाचे आम्हीच वाली असा टेंभा नेतेमंडळी मिरवतात. मात्र निवडणुकीचे निकाल जाहीर झाले की, सगळे गंगेला मिळाले.

# राजकारणात मानवतेचा स्पर्श म्हणजे राजेश टोपे यांचे आरोग्य नेतृत्व होय..!



जालना - तो जव जव मार्गे चाले.. कार्य करी पाऊले पाऊले.. लोक पाहताचि नम्र झाले.. दिसती त्यासि.. तो नसेल तरी बोलका.. व्याख्याता उपदेशक नेटका.. तरी वक्त्या पंडिताहुनी लोकां.. वजन तयाचे.. ऐसीचि लोक गाव सुधारती.. देशाचे नाव उज्वल करिती.. नसेना कोणा त्यांची माहिती.. सुगंध उधळती वनपुष्पे..

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या वचनाप्रमाणे राजेश टोपे यांच्या रूपाने मराठवाड्यात कार्य कुशल सुपुत्राच्या जन्म पाथरवाला येथे ११ जानेवारी १९६९ रोजी माता शारदाताई व अंकुशराव टोपे साहेबांच्या पोटी झाला. राजकारणाचा वारसा कुटुंबातूनच अगदी कॉलेज जीवनात शैक्षणिक, सामाजिक, सहकार व राजकीय कार्याची आवड जालना जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते स्व.खा. ड. अंकुशराव टोपे साहेब यांच्या संस्कारातून व देशाचे नेते मा. खा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या नेतृत्वात राजकीय जडणघडण झाली. राजेश टोपे यांनी वयाच्या २३ व्या वर्षी राजकारणात प्रवेश केला. त्यांनी सलग पाच वेळेस अंबड व घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करतानाच महाराष्ट्राच्या राजकारणात राज्यमंत्री ते कॅबिनेट मंत्री म्हणून अत्यंत कार्य कुशल, अभ्यासू व मेहनती नेता म्हणून त्यांची ओळख निर्माण केली. राजकारण अनेकदा सत्ताकेंद्रित आणि स्वार्थप्रधान असल्याचे टीका होते. परंतु माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी आपल्या कार्यातून या समजुतीला छेद दिला.

२०१९ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले व त्यांच्याकडे आरोग्य मंत्री पदाची जबाबदारी आली. याच दरम्यान जगावर कोरोना महामारीचे संकट उभे राहिले या जागतिक आपत्तीचे प्रत्येक व्यक्तीच्या मनात भीतीचे वातावरण होते. या संकटात वेगवेगळे देशात- देशांतर्गत, राज्य अंतर्गत तसेच शहरातील व ग्रामीण भागात मदतीचे दरवाजे एकमेकांना बंद झाली. अवघ्या मानव जातीला नवीन असलेल्या कोरोना संकटाला दोन हात करण्यासाठी महाराष्ट्राचे लढवय्ये नेते राजेश टोपे साहेब अहोरात्र काम करत होते. या कार्यकाळात राज्यातील जनतेला राजेश टोपे यांनी सेवा, संवेदना आणि जबाबदारी या मूल्यांना प्राधान्य देवून राजकारणात मानवतेचा खरा अर्थ अधोरेखित केला. आरोग्य मंत्री म्हणून ग्रामीण व शहरी आरोग्य व्यवस्थेतील तफावत कमी करण्यावर भर दिला. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये यांची सुविधा सुधारण्यासोबतच वैद्यकीय मनुष्यबळ उपलब्धतेसाठी ठोस पावले उचलली. सामान्य रुग्णाला दर्जेदार आणि परवडणारी आरोग्यसेवा मिळावी, हा त्यांच्या धोरणांचा केंद्रबिंदू राहिला.

कोविड-१९ महामारीच्या कठीण काळात राजेश टोपे यांचे नेतृत्व विशेषत्वाने उठून दिसले. संसर्गाची तीव्रता, आरोग्य यंत्रणेवरील ताण आणि नागरिकांमधील भीती या साऱ्या परिस्थितीत त्यांनी संयम, पारदर्शकता आणि माणुसकीचा दृष्टिकोन जपला. रुग्णालयांची क्षमता वाढवणे, टेस्टिंग सेंटर उभारणे, ऑक्सिजन पुरवठा, लसीकरण मोहीम, मेडिकल सुविधा, रुग्णवाहिका, डॉक्टर्स, नर्स स्टाफ, ऑक्सिजन बेड आणि आरोग्य कर्मचारी,पोलीस मित्र व समाजसेवकांचे मनोबल उंचावणे यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सर्वसामान्य जनतेला दैनंदिन अन्नधान्य व वस्तू पुरवणे, रुग्ण तसेच नातेवाईकांना मानसिक धैर्य देण्याचे महत्त्वाचे काम रात्रंदिवस करत होते. प्रसारमाध्यमांशी संवाद साधून नागरिकांना योग्य माहिती देणे हेही त्यांच्या नेतृत्वाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले.

कोरोना काळात राजेश टोपे साहेब यांनी आरोग्य मंत्री या नात्याने प्रशासकीय यंत्रणा सोबत घेऊन माणुसकी कमी होत असताना आपण समाजाचे देणे लागतो या उदात्त हेतूने प्रेरित होऊन मानतवादी दृष्टिकोनातून समाजातील लहान थोर, महिला, तरुण व ज्येष्ठ नागरिकांना आपुलकीची साथ दिली. महाराष्ट्रातील कोरोनाग्रस्त जिल्ह्यातील रुग्णालयात प्रत्यक्ष भेट देऊन रुग्णांना व नातेवाईकांना मानसिक धैर्य देत आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या.

ते स्वतः इंजिनियर आहे परंतु महाराष्ट्रातील जनता त्यांना डॉक्टर म्हणून ओळखू लागली. या काळात त्यांच्या मातोश्री शारदा ताई टोपे यांचे निधन झाले. तरी भैय्यासाहेब चौथ्या दिवशी जनसेवेसाठी कार्यरत राहिले. हे सर्व कार्य करत असताना महाराष्ट्रातील जनता प्रसारमाध्यमाद्वारे बघत होती. जनतेला राजेश टोपे म्हटले की आशेचा किरण वाटत होता. जनतेचे व साहेबांचे हृदयातील नाते तयार झाले होते. महाराष्ट्रातील जनता म्हणजे कुटुंब हे त्यांनी ठरवले होते. रात्री अपरात्री राज्याच्या कानाकोपऱ्यातून त्यांना फोन येत व ते जनतेला सुविधा पुरवत होते. स्वतः त्यांना जेवणासाठी ही वेळ कमी पडत होता. या सर्व कार्यात त्यांना साथ देणाऱ्या त्यांच्या सौभाग्यवती सौ. मनीषाताई टोपे या खंबीरपणे त्यांच्या पाठीमागे उभ्या होत्या. या कार्यकर्तुत्वामुळेच राजकारणातील आजात शत्रू म्हणून त्यांची ओळख होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या वचनाप्रमाणे अगदी तंतोतंत उतरणारे व्यक्तिमत्व राजेश टोपे साहेब यांनी आपल्या गाव खेड्यापासून ते दिल्लीपर्यंत आपल्या कार्याची चुणूक दाखवली. व त्यांच्या कार्याची नोंद भारत देशात नव्हे तर डब्ल्यूएचओ पर्यंत झाली . एकूणच राजेश टोपे यांचे आरोग्य नेतृत्व हे सत्तेच्या प्रदर्शनापेक्षा सेवाभावावर आधारित राहिले. सामान्य नागरिकांच्या वेदना समजून घेणारे, संकटात धीर देणारे आणि आरोग्याला मूलभूत हक्क मानणारे हे नेतृत्व महाराष्ट्राच्या राजकारणात मानवतेचा स्पर्श उमटवणारे ठरले.

साहेबांच्या अभिष्टचिंतन दिनानिमित्त महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या वतीने साहेबांना निरोगी व दीर्घ आयुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

शब्दांकन....

**डॉ. शंकर तिकांडे,**

जालना ( ८८८८१७११३४ )



## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सात्रा येथे 'बाल आनंद मेळाव्याचे' उत्साहात संपन्न

प्रतिनिधी @ बीड

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि शालेय जीवनात आनंदाचे वातावरण निर्माण करण्यासाठी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सात्रा (हनुमान नगर वस्ती) येथे 'बाल आनंद मेळाव्याचे' भव्य आयोजन करण्यात आले होते, हा सोहळा शनिवार दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाला.

या मेळाव्याचा उद्देशच कमवा आणि शिका,तसेच मुलांना चलनी नोटांची माहिती व्हावी, व्यवहार ज्ञान कळावे,तसेच आपले आई वडीलांच्या कष्टा बाबत मुलांना जान व्हावी हा होता.या आनंदोत्सवामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी विक्री साठी फळे,भाजीपाला,खेळणे,वेगवेगळे खाद्य पदार्थ बनवऊन विक्रीसाठी आणले होते. हा सोहळा केंद्राचे केंद्रप्रमुख श्री शेख सर केंद्रीय मुख्याध्यापक श्री मोटे सर आंधळे सर, गायकवाड सर, नवले सर, दोन्ही शाळेचे मुख्याध्यापक, सहशिक्षक गावचे सरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष पालक व सर्व गावकरी यांच्या उपस्थितीत हा बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

# ग्रामीण भागातील भाजपच्या कार्यकर्त्यांची घडी कधीच विस्कटू देणार नाही - बाळराजे पवार

प्रतिनिधी @ गेवराई

## जि.प. व पंचायत समितीत आबांच्या साथीने भाजपची एकहाती सत्ता स्थापन करू कार्यकर्त्यांच्या बैठीत दिला विश्वास

गेल्या पंधरा वर्षांपासून ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांची नाळ आमच्याशी घट्ट जुळलेली आहे. याच कार्यकर्त्यांच्या बळावर विधानसभेत मोठा कौल मिळाला होता. मात्र गत विधानसभेत आपला पराभव झाला असला तरी येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीत आबांच्या साथीने भाजपची एकहाती सत्ता स्थापन करू असा विश्वास देत ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांची घडी कधीही विस्कटू देणार नाही, असे ठाम प्रतिपादन भाजप नेते बाळराजे पवार यांनी केले.

गेवराई येथे दि. १० रोजी आयोजित ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी जिल्हा परिषद सदस्य पांडुरंग थडके, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, दादासाहेब गिरी, माजी पंचायत समिती सदस्य प्रा. शाम कुंडझ, संदीप लगड, संजय



जाधव, सिद्धार्थ नरवडे, डिगांबर येवले यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

बाळराजे पवार पुढे म्हणाले की, देशात भाजपची एकहाती सत्ता असून राज्यात महायुतीचे भक्कम सरकार कार्यरत आहे. हा काळ भाजपसाठी अत्यंत अनुकूल असून आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपची एकहाती सत्ता स्थापन करण्याचे लक्ष्य आहे. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली आणि बदामरावजी आबा पंडित यांच्या साथीने हे उद्दिष्ट साध्य करायचे आहे. यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने जोमाने कामाला लागावे, मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, असा विश्वास त्यांनी दिला.

ग्रामीण भागात अद्याप अनेक विकासकामे प्रलंबित असून येत्या काळात ती पूर्ण करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासनिधी उपलब्ध होणार असून त्या निधीतून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. नगरपरिषद माझ्या नेतृत्वाखाली झाली, आता जिल्हा परिषद व पंचायत समिती बदामरावजी आबा यांच्या नेतृत्वाखाली घ्यायची आहे, असा निर्णय आम्ही एकत्र बसून घेतला आहे, असेही ते म्हणाले.

या निवडणुकीत उमेदवार कोणीही असो, तो भाजपचाच आहे, ही भूमिका मनात ठेऊन सर्वांनी एकोप्याने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. तिकीट मिळाले नाही म्हणून कोणीही नाराज होऊ नये. ज्याला उमेदवारी मिळेल, त्याच्या पाठीशी प्रामाणिकपणे उभे राहा, कारण येणारा काळ भाजपचाच आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पुढील सर्व निर्णय पंकजाताई मुंडे यांच्या आदेशानुसारच होतील, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

# भक्ती, परमार्थ आणि जनसेवेचा दिव्य संगम

## संत तुकाराम महाराजांच्या वंशजांकडून आ.सुरेश धस यांचा पुण्यात झालेला ऐतिहासिक गौरव

आष्टी - (राजेंद्र लाड) भारतीय संस्कृतीच्या मुळाशी असलेली संकल्पना म्हणजे सेवा हीच ईश्वरसेवा. आपल्या संतपरंपरेने हेच मूल्य पिढ्यान् पिढ्या रुजवले आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम महाराज यांनी समाजाला अध्यात्माबरोबरच सामाजिक जाणिवेची दिशा दिली. भक्ती म्हणजे केवळ देवपूजा नव्हे, तर ती माणसांवर प्रेम करण्याची, त्यांच्या दुःखात सहभागी होण्याची आणि त्यांना न्याय मिळवून देण्याची प्रेरणा आहे. हेच या संतांनी आपल्या अभंगांतून सांगितले.

अशाच या पवित्र विचारधारेचा प्रत्यय पुण्यनगरीत एका विलक्षण आणि भावस्पर्शी प्रसंगातून आला. संत तुकाराम महाराजांच्या वंशजांच्या हस्ते आमदार सुरेश अण्णा धस यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. हा केवळ एका लोकप्रतिनिधीचा सन्मान नव्हता, तर तो जनतेच्या सेवेला मिळालेला अध्यात्मिक आशीर्वाद होता.

पुणे हे विद्येचे, संस्कृतीचे आणि संतपरंपरेचे माहेरघर. याच पुण्यभूमीत हा अनोखा सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. मात्र या सोहळ्याचे खरे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा आत्मा. तो आत्मा होता भक्तीचा, करुणेचा आणि सेवेचा. सुरेश अण्णा धस हे आज केवळ एक आमदार म्हणून ओळखले जात नाहीत, तर ते लोकांचा माणूस म्हणून ओळखले जातात. सामान्य माणसाच्या अडचणी, त्यांचे दुःख, त्यांची धडपड, त्यांची आशा या सर्व गोष्टी त्यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू राहिल्या आहेत.

संत तुकाराम महाराजांच्या वंशजांनी सुरेश अण्णा धस यांना वारकरी संप्रदायाची ओळख असलेली टाळ, वीणा आणि वारकरी पगडी प्रदान केली. हा सन्मान म्हणजे केवळ वस्त्रप्रावरण नव्हते; तो एका विचारसरणीचा स्वीकार होता.



वारकरी संप्रदाय हा समता, बंधुता, प्रेम आणि सेवाभावाचा संदेश देतो. येथे राजा आणि रंक एकाच रांगेत उभे राहतात. येथे अहंकाराला स्थान नाही. येथे सर्वजण विठ्ठलाचे लेकरू असतात. अशा या पवित्र परंपरेचे प्रतीक सुरेश अण्णा यांनी अंगावर धारण करणे, ही एक अत्यंत अर्थपूर्ण बाब होती.

या वेळी त्यांना प्रभू श्रीरामांची मूर्ती भेट देण्यात आली. राम हे केवळ देव नाहीत; ते एक मूल्यव्यवस्था आहेत. त्याग, संयम, कर्तव्य, सत्यनिष्ठा आणि करुणा या सर्वांचा संगम म्हणजे राम. सुरेश अण्णांनी ही मूर्ती स्वीकारताना व्यक्त केलेली नम्रता अनेकांच्या डोळ्यांत पाणी आणणारी होती. ही मूर्ती म्हणजे त्यांना दिलेली एक जबाबदारीच होती. रामासारखे वागण्याची, लोकांसाठी जगण्याची, आणि सत्याच्या बाजूने उभे राहण्याची.

मान्यवरांनी आपल्या भाषणात सुरेश धस यांना कलियुगातील जनसेवक म्हटले. हा शब्द केवळ अलंकारिक नव्हता. आजच्या काळात राजकारण हे अनेकदा सत्ताकेंद्रित, स्वार्थकेंद्रित झालेले दिसते. अशा वातावरणात जेव्हा एखादा नेता लोकांसाठी जगतो, तेव्हा तो खरोखर वेगळा ठरतो. शेतकऱ्यांचे प्रश्न असोत, बेरोजगार तरुणांची चिंता असो, महिलांचे हक्क असोत, गरिबांच्या समस्या असोत, सुरेश अण्णा यांनी या सर्व बाबींमध्ये प्रत्यक्ष मैदानात उतरून काम केले आहे. ते फक्त भाषणातच नाही, तर कृतीतही दिसून आले आहेत.

नेतृत्व म्हणजे केवळ सत्ता नव्हे; नेतृत्व म्हणजे जबाबदारी. सुरेश अण्णांचे नेतृत्व हे सेवाभावी नेतृत्व आहे. एखाद्या गरजू माणसासाठी मध्यरात्री फोन आला, तरी ते धावून जातात. हीच त्यांची ओळख आहे. आज समाजाला अशाच नेत्यांची गरज आहे. जे पदाला नव्हे, तर माणसाला महत्त्व देतात. हा सत्कार सोहळा एक मोठा संदेश देऊन गेला. अध्यात्म आणि कृती वेगवेगळी नाहीत. खरे अध्यात्म म्हणजे समाजासाठी झटणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे, आणि दुर्बलांना बळ देणे. संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे: जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले. याच विचाराचा वारसा सुरेश अण्णा धस आपल्या कार्यातून पुढे नेताना दिसतात.

भविष्यासाठी दीपस्तंभ

हा सत्कार केवळ वर्तमानाचा गौरव नव्हता, तर तो भविष्यासाठी एक दीपस्तंभ होता. आजच्या तरुण पिढीला यामधून एक स्पष्ट संदेश मिळतो. राजकारण हे सेवा असू शकते. सत्ता म्हणजे संधी असू शकते जनतेसाठी काहीतरी करण्याची.

या संपूर्ण सोहळ्याचा सारांश एका वाक्यात सांगायचा झाला तर तो असा जनतेची सेवा हाच खरा परमार्थ. संत तुकाराम महाराजांच्या वंशजांनी दिलेला हा सन्मान म्हणजे सुरेश धस यांच्या कार्याला मिळालेली पावतीच आहे. हा प्रसंग इतिहासात नोंदला जाईल कारण तो केवळ एका नेत्याचा सत्कार नव्हता, तर माणुसकीचा, भक्तीचा आणि सेवाभावाचा विजय होता.



## अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ऊसतोड मजुराच्या कुटुंबाला धस कुटुंबीयांचा आधार

## जयदत्त धस यांच्याकडून एक लाख रुपयांची एफडी सुपूर्द

आष्टी (प्रतिनिधी) कारखाना साईडवर झालेल्या अपघातात दुःखद निधन झालेल्या ऊसतोड मजूर व रिल स्टार म्हणून ओळखले जाणारे गणेश डोंगरे यांच्या कुटुंबीयांना लोकनेते आ. सुरेश धस यांच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली.

आज डोंगरे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन करण्यात आले. या वेळी कुटुंबाच्या आधारासाठी एक लाख रुपयांची एफडी मदत स्वरूपात सुपूर्द करण्यात आली. ही एफडी जयदत्त भैया धस यांच्या हस्ते देण्यात आली.

या प्रसंगी मा. सरपंच हरी पवार यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. अचानक आधार गमावलेल्या कुटुंबाच्या दुःखात सहभागी होत, या कठीण प्रसंगी आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, अशा भावना लोकनेते सुरेश धस यांच्या वतीने व्यक्त करण्यात आल्या.

# आरकेएसव्हीएम शाळेत चिमुकल्यांचे वार्षिक संमेलन उत्साहात संपन्न

धर्माबाद / अशोक पडोळे

येथील आरकेएसव्हीएम शाळेत चिमुकल्यांचे वार्षिक संमेलन अत्यंत आनंदी व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी श्रीक्षेत्र बासर येथील कार्यकारी अधिकारी मा. अंजनादेवी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. मान्यवरांच्या शुभहस्ते माता सरस्वती देवीचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची विधिवत सुरुवात करण्यात आली.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मा. अंजनादेवी म्हणाल्या की, आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणासोबत संस्कारांची नितांत गरज आहे. आरकेएसव्हीएम शाळा विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाबरोबरच जीवनमूल्ये व संस्कार देण्याचे मोलाचे कार्य करत आहे, हे निश्चितच प्रशंसनीय आहे. चिमुकल्यांच्या वार्षिक संमेलनाच्या प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रण मिळाले, हे आपण भाग्य समजत असल्याचे सांगून त्यांनी शाळेच्या विश्वस्त मंडळाचे मनःपूर्वक आभार मानले. आज येथे शिक्षण घेणारा प्रत्येक विद्यार्थी आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी बीज पेरत असून हे बीज उद्या विशाल वटवृक्षाप्रमाणे समाजाला दिशा देणाऱ्या सनदी अधिकाऱ्यांच्या रूपाने फळाला येईल, अशा आशावादी भावना त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केल्या.




नर्सरी, ज्युनियर के.जी. व सीनियर के.जी.च्या चिमुकल्यांनी सादर केलेल्या ग्रुप नृत्य, गीत व विविध कलाकृतींनी उपस्थितांची मने जिंकली. चिमुकल्यांच्या सादरीकरणाचा आनंद घेण्यासाठी पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. आपल्या पाल्यांचे कौशल्य, आत्मविश्वास व उत्स्फूर्त सादरीकरण पाहून अनेक पालकांचे डोळे पाणावले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे प्राचार्य सौरभ सक्सेना यांनी आरकेएसव्हीएम शाळेवर पालकांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत शैक्षणिक गुणवत्ता, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम तसेच व्यक्तिमत्त्व विकासावर विशेष भर दिला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी शाळेचे व्यवस्थापकीय संचालक सुबोध काकाणी यांनी शाळेच्या कार्यपद्धतीवर सविस्तर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, चिमुकल्यांसाठी वार्षिक संमेलनाचे आयोजन करण्यात येते. इयत्ता १ ली ते २ री साठी परभणी येथे हुरडा पार्टी, इयत्ता ३ री ते ४ थी साठी जगप्रसिद्ध ताडोबा जंगल सफारी (चंद्रपूर) तर इयत्ता ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी गुजरात येथे विमानाने शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच आगामी वर्षात शैक्षणिक सहलीचे नियोजन परदेशात करण्यात येईल, असे आश्वासन देत त्यांनी पालकांचा विश्वास अधिक दृढ केला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली तर समारोप वंदे मातरम्ने करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे सुंदर, शिस्तबद्ध व प्रभावी सूत्रसंचालन शिवानी कणशेटे मॅडम व सीमा हाळे मॅडम यांनी केले.चिमुकल्यांचा पात्रपरिचय शिवांश, ओवी, आदर्श, प्रिशा, अश्विता, आरोही, वर्णिका, मंथन, साक्षी, कनिष्का, अनुश्री, रितिका, मोक्षश्री, आर्या, दुर्गा, श्रीवर्धन व श्रीजा या चिमुकल्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने व उत्कृष्टपणे करून दिला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे संचालक सुनील श्रीवास्तव सर यांच्या मार्गदर्शनाखाली रावसाहेब पवार सर, धम्मशीला मॅडम यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# मराठवाड्यातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्या बीड जिल्ह्यात




प्रतिनिधी @ बीड

## सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने - डॉ. गणेश ढवळे

मराठवाड्यात २०२५ या वर्षात एकूण ११२९ शेतकरी आत्महत्या झाल्या असून, त्यामध्ये बीड जिल्ह्यातील २५६ शेतकऱ्यांनी आत्महत्या करत मरणाला कवटाळले आहे. मागील दोन वर्षांपासून बीड जिल्हा मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांमध्ये आघाडीवर असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. शासन व प्रशासनाच्या शेतकरीविरोधी धोरणांमुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढले असून, सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण या घोषणेच्या निषेधार्थ आज शुक्रवार दि. ०९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण घोषणाबाजी करत जोरदार निदर्शने करण्यात आली. ही निदर्शने सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. यावेळी आंदोलकांनी सरकार व प्रशासनाने केवळ फोटोसेशनपुरते मर्यादित न राहता शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी ठोस व परिणामकारक पावले उचलावीत अशी ठाम मागणी केली. यावेळी आंदोलनात माजी सैनिक अशोक येडे ( जिल्हाध्यक्ष,आम आदमी पार्टी ,रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष इंटक), कुलदीप करपे ( जिल्हाध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना ) शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, सुहास जायभाये , माहिती आधिकार कार्यकर्ते शेख मुबीन , पांडुरंग हराळे , गणेश नाईकवाडे (जिल्हाध्यक्ष मराठा महासंघ),प्रा.डी.जी.तांदळे(अध्यक्ष म.रा.किसानसभा जि.बीड, प्रा.राजकुमार यादव, डॉ.संजय तांदळे आदी सहभागी होते.

# महाराष्ट्र शासन आयोजित चित्रकला परीक्षेत पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टीच्या विद्यार्थिनींचे घवघवीत यश

आष्टी (राजेंद्र लाड) महाराष्ट्र शासनामार्फत घेण्यात आलेल्या चित्रकला परीक्षेत पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला, आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन करत प्रशालेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. या परीक्षेत एकूण ७२ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला असून त्यापैकी ३२ विद्यार्थिनींनी '-' ग्रेड, ११ विद्यार्थिनींनी 'इ' ग्रेड तर २७ विद्यार्थिनींनी 'उ' ग्रेड मिळवून आपली कलात्मक गुणवत्ता सिद्ध केली आहे.

'-' ग्रेड प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनींमध्ये आलिया अल्ताफ शेख, आदिती पंढरीनाथ खोटे, अक्षरा अशोक गुरव, अंकिता अंकुश राठोड, अश्विनी परसराम टकले, आयेशा सत्तार पठाण, चंचल अशोक चव्हाण, दिव्या सोमीनाथ गरसुळे, हुदा नदीम शेख, ईश्वरी रवींद्र सदावर्ते, कोमल गोकुळ पाखरे, क्रांती वाल्मीक वारंगुळे, मनाल असिफ बागवान, मारिया मुजाहिद शेख, नम्रता अशोक भवर, प्राजक्ता ज्ञानदेव गायकवाड, प्राजक्ता शाम रेडेकर, प्रांजली गोवर्धन आजबे, प्रतिक्षा शरद पवार, प्रिया बाळासाहेब धोंडे, रुद्राली गोकुळ राऊत, ऋतुजा उद्धवराज धाराशिवकर, सई सतीश लाड, शिवानी तुकाराम भवर, शुभांगी हरिभाऊ तोडकर, स्नेहा पांडुरंग धोंडे, सुहानी सुभाष कांबळे, स्वराली लक्ष्मण



सोले, तेजश्री तान्हाजी रेडेकर, तेजस्विनी राहुल मोरे, तृप्ती गोवर्धन आजबे, यशांजली माणिक भवर आदींचा समावेश आहे.

तसेच 'इ' ग्रेड प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनींमध्ये आदिती जालिंदर वाल्हेकर, निकिता उमेश मुरकुटे, प्रगती महादेव मुटकुळे, राजनंदिनी हनुमंत केरूळकर, साक्षी नवनाथ फुंदे, संस्कृती विजयकुमार झगडे, शिवांजली दिलीप सोले, सोफिया साजिद पठाण, सृष्टी महेश कदम, तनुजा रामभाऊ माने व वेदिका श्रीकांत चौधरी यांचा समावेश आहे.

या उल्लेखनीय यशामागे विद्यार्थिनींचे सातत्यपूर्ण परिश्रम, कला विषयातील आवड आणि मार्गदर्शक शिक्षिका श्रीमती कोमल थेटे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. त्यांच्या योग्य नियोजनामुळे व प्रोत्साहनामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढून त्यांनी हे यश संपादन केले. याकामी त्यांना श्रीम. सुनिता पोकळे मॅडम, भागवत वायाळ सर व श्रीराम नाईक सर यांचे सहकार्य लाभले. या सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे प्रशालेचे मुख्याध्यापक आबासाहेब खताळ सर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा श्रीम. सुजाता झगडे मॅडम, सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालकांनी मनःपूर्वक अभिनंदन केले असून भविष्यातही अशाच प्रकारे विविध स्पर्धांमध्ये यश मिळवावे, अशा शुभेच्छा दिल्या आहेत.

# मनरेगावर केंद्र सरकारचा वरवंटा, ग्रामीण जनतेची जीवनवाहिनी रोखण्याचा कुटील डाव

## खा.डॉ.कल्याण काळे यांनी मनरेगा बचाव संग्रामाचे रणशिंग फुंकले

प्रतिनिधी @ जालना

**ग्रामीण भारताचा कणा असलेल्या मनरेगा योजनेचे अस्तित्वच संपवण्याचा कुटील डाव केंद्र सरकारने रचला आहे. अन्यायकारक अटी आणि बदलांच्या माध्यमातून ग्रामीण मजुरांच्या तोंडचा घास हिरावला जात असून ही योजना पद्धतशीरपणे बंद करण्याचा घाट घातला जात आहे असा खळबळजनक आरोप जालन्याचे काँग्रेस खासदार डॉ. कल्याण काळे यांनी आज येथे केला.**



### जनतेने मैदानात उतरावे

या अन्यायाविरुद्ध आता आरपारची लढाई लढण्याची वेळ आली आहे.जलसंधारण, मृदसंवर्धन आणि पर्यावरण रक्षणासाठी महत्त्वाची असलेली ही योजना वाचवण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था शेतकरी आणि मजुरांनी मनरेगा बचाव संग्रामात सक्रिय सहभागी व्हावे असे आवाहन डॉ.काळे यांनी यावेळी केले.या आक्रमक पवित्र्यामुळे आगामी काळात मनरेगाच्या मुद्द्यावरून जिल्ह्यात मोठे जनआंदोलन उभे राहण्याचे संकेत मिळत आहेत.

जालना येथील संपर्क कार्यालयात शनिवारी १० जानेवारी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.यावेळी त्यांनी केंद्र सरकारच्या कामगारविरोधी धोरणांचे वाभाडे काढत काँग्रेसच्या वतीने देशभर राबविण्यात येत असलेल्या मनरेगा बचाव संग्राम मोहिमेची सविस्तर माहिती दिली.नाव बदलले आता न्यायही हिरावणार खासदार डॉ.काळे म्हणाले की मनरेगा ही केवळ योजना नसून ग्रामीण भागातील गरिबांच्या सन्मानाची आणि आर्थिक सुरक्षिततेची लाईफलाईन आहे.मात्र केंद्र सरकारने या योजनेचे नाव बदलून तइ-ऋठ-च् ऋ असे करत मूळ संकल्पनेलाच हरताळ फासला आहे. १०० दिवस रोजगाराची असलेली कायदेशीर हमी आता संपुष्टात आली असून, मजुरांना वाऱ्यावर सोडण्यात आले आहे.राज्यांवर ४०% बोजा; योजना डबघाईला नेण्याचा कट

डॉ.काळे यांनी केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांवर सडकून टीका केली.ते म्हणाले निधीत कपात पूर्वी मजुरीचा १०० टक्के खर्च केंद्र उचलत असे, आता राज्यांवर ४० टक्क्यांचा बोजा टाकण्यात आला आहे. यामुळे आर्थिक संकटात असलेली राज्ये कामे मंजूर करण्यास धजावणार नाहीत.ग्रामपंचायतींचे पंख छाटले गावातील कामांचे अधिकार आता सरकारकडे राखीव राहतील. स्थानिक स्वराज्य संस्थांची स्वायत्तता धोक्यात आली आहे.मजुरीचे दर अनिश्चित कायद्याने ठरलेली मजुरी बंद करून आता सरकार मर्जीनुसार दर ठरवणार आहे.जर मनरेगा कमकुवत झाली तर ग्रामीण भागात बेरोजगारीचा भडका उडेल. मजुरांचे शहरांकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होईल आणि ग्रामीण विकासाची चक्रे थांबतील.हा केवळ मजुरांवरचा अन्याय नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेवर केलेला सर्जिकल स्ट्राईक आहे.

# महाराष्ट्राच्या राजकारणातील सुसंस्कृत व संवेदनशील नेतृत्व

## कोरोना योद्धा माजी आरोग्यमंत्री राजेश भैय्या टोपे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छांचा वर्षाव..

प्रतिनिधी @ जालना

महाराष्ट्राच्या राजकारणात सुसंस्कृत विचार संवेदनशीलता आणि विकासाभिमुख कार्यशैली यांचा आदर्श वस्तुपाठ घालून देणारे नेतृत्व म्हणजे माजी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री कोरोना योद्धा आदरणीय राजेश भैय्या टोपे साहेब.सहकार महर्षी कर्मयोगी माजी खासदार स्व. अंकुशरावजी टोपे साहेबांच्या सामाजिक व राजकीय वारशाला समर्थपणे पुढे नेत महाराष्ट्राच्या राजकारणात आश्वासक चेहरा म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

उच्च विद्या विभूषित असलेले राजेश टोपे साहेब हे असे नेतृत्व आहे की कोरोना महामारीच्या काळात त्यांच्या कार्याची दखल थेट देशपातळीवर घेतली गेली. लाखो नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी अहोरात्र झटणारे हे नेतृत्व खऱ्या अर्थाने कोरोना योद्धा ठरले.राजेश टोपे साहेबांच्या कुटुंबाशी आमच्या वडिलांपासून जिव्हाळ्याचे व कौटुंबिक संबंध असून ही नाळ आज दुसऱ्या पिढीतही तितक्याच आत्मीयतेने जपली जात आहे हे अभिमानाने नमूद करावेसे वाटते.२५ वर्षांचा विकासाचा प्रदीर्घ प्रवास

जवळपास २५ वर्षे महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात विविध खात्यांची जबाबदारी समर्थपणे सांभाळत राजेश टोपे साहेबांनी राज्याला दिशादर्शक असे कार्य केले. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री असताना अंबड येथे उभारलेले भव्य पॉलिटेक्निक कॉलेज अंबड व घनसावंगी येथील आयटीआय संस्था सुसज्ज नाट्यगृहे, ग्रंथालये,न्यायालये,घनसावंगी येथील अत्याधुनिक बसस्थानक ही त्यांच्या विकासदृष्टीची ठळक उदाहरणे आहेत.शेतकरी व सहकार क्षेत्राचा कणा मजबूत समर्थ सहकारी साखर कारखाना अंकुशनगर तसेच सागर सहकारी साखर कारखाना तीर्थपुरी यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उसाला योग्य दर आधुनिक व्यवस्थापन कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर अत्याधुनिक यंत्रणा अल्कोहोल व वीज निर्मितीसारखे पूरक उद्योग यशस्वीपणे राबवण्यात आले. देशपातळीवरील उत्कृष्ट व्यवस्थापनाचे अनेक पुरस्कार प्राप्त करणारा समर्थ सहकारी साखर कारखाना हा मराठवाड्यातील सहकाराचा अभिमान



बनला आहे.

शिक्षण व रोजगाराचा भक्कम पाया माजी खासदार स्व. अंकुशराव टोपे साहेबांनी १९७४ मध्ये स्थापन केलेल्या मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आज हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. याच संस्थेमुळे अनेक तरुणांना शिक्षक प्राध्यापक व प्राचार्य पदापर्यंत रोजगाराची संधी मिळाली आहे.समर्थ बँक,यशवंत सूतगिरणी, साखर कारखाने व शिक्षण संस्था यांच्या माध्यमातून सुमारे ३,००० लोकांना रोजगार उपलब्ध करून देणारे हे नेतृत्व आहे.

समाजकारण आणि संवेदनशीलतेचा आदर्श अंबड व घनसावंगी तालुक्यातील अनेक गरजू नागरिकांच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रिया पुणे येथे करून त्यांना नवी दृष्टी देण्याचे कार्य राजेश टोपे साहेबांच्या माध्यमातून झाले.गोरगरीब, वंचित,दलित,शोषितांच्या सुख-दुःखात ठामपणे उभे राहणारे हे नेतृत्व खऱ्या अर्थाने जनतेचे आहे.कोरोना काळातील अतुलनीय योगदान राज्यभर प्राथमिक आरोग्य केंद्रे सुसज्ज करणे ५० खाटांच्या रुग्णालयांचे १०० खाटांत रूपांतर ऑक्सिजन व बेडअभावी होणारे मृत्यू रोखण्यासाठी अनेक कोरोना सेंटर उभारणे हे कार्य करत असताना स्वतःच्या मातोश्री आजारी असतानाही जनसेवेला प्राधान्य देणारे राजेश टोपे साहेब खऱ्या अर्थाने आदर्श ठरले.मातोश्री स्व.शारदाताई टोपे यांच्या निधनाचे अपार दुःख असतानाही त्याचा दीर्घ शोक न करता तात्काळ महाराष्ट्राच्या जनतेच्या सेवेत पुन्हा रुजू होणारे हे नेतृत्व दुर्मिळच म्हणावे लागेल.नम्रता आपुलकी आणि माणुसकीचे प्रतीक

लहानातल्या लहान कार्यकर्त्यापासून मोठ्या नेत्यांपर्यंत प्रत्येकाशी आपुलकीने आदराने आणि नम्रतेने वागणारे व्यक्तिमत्व म्हणजे आदरणीय राजेश भैय्या टोपे साहेब. आजच्या तरुण पिढीसमोर ते एक प्रेरणादायी आदर्श आहेत.अशा या सुसंस्कृत,संवेदनशील आणि विकासाभिमुख नेतृत्वाला वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!

शुभेच्छुक
कल्याण नरसिंगराव सोळुंके
मुख्याध्यापक तथा
महाराष्ट्र राज्य आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक

# फातिमा शेख यांचे कार्य स्त्रीशिक्षण, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाचे प्रतीक आहे - नगरसेवक शेख राईस

## जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात पत्रकार संघाच्या वतीने अल्पसंख्यांक समाजातील पहिल्या महिला स्त्री शिक्षिका फातिमा शेख यांची जयंती सामाजिक उपक्रमांनी साजरी








प्रतिनिधी @ बीड

त्या काळात दलित,वंचित, मुस्लिम समाजातील स्त्रियांना शिक्षणाची द्वारे उघडी नव्हती. महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून फातिमा शेख यांनी शिक्षणाची धुरा पुढे नेली. सामाजिक बहिष्कार, अपमान आणि धमक्यांना तोंड देत त्यांनी सुरू केलेले शिक्षणाचे कार्य कायम ठेवले. यामुळेच खऱ्या अर्थाने स्त्रीशिक्षण, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाचे खरे प्रती म्हणजे फातिमा शेख होय. पडद्यामागे असलेल्या फातिमा शेख यांची जयंती पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात खऱ्या वंचितामध्ये साजरी करून त्यांच्या विचारांना खऱ्या अर्थाने न्याय दिला आहे असे प्रतिपादन नवनिर्वाचित नगरसेवक शेख रईस यांनी जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथील निराधार,वंचित घटकांसमवेत अल्पसंख्याक समाजातील पहिल्या महिला स्त्री शिक्षिका फातिमा शेख यांची जयंती ९ जानेवारी रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि दैनिक समर्थ राजयोग यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे आयोजक पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख तथा संपादक वैभव स्वामी यांच्यासह फौजदार राजू गुळभिले,नगरसेवक शेख रईस, निराधार,विधवा, वंचित, निरक्षर महिलांना न्याय देण्यासाठी तत्पर असलेल्या सामाजिक कार्यकर्त्या रेहाना पठाण यांच्यासह आम्रपाली साबळे, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. ओमप्रकाश नायर, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता गोपाळ नाईक, एसटी महामंडळातील सेवानिवृत्त बाबासाहेब जाधव, महारुद्र मोराळे, लक्ष्मणराव वंजारे, राजकुमार कागदे जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, मुख्य व्यवस्थापक राजू वंजारे, महिला काळजीवाहक छायाताई सरोदे यांच्यासह मान्यवर मंडळी उपस्थित होती. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्त्या रेहाना पठाण म्हणाल्या की, फातिमा शेख यांच्या कार्यामुळे भारतीय समाज सुधारणेच्या इतिहासात मुस्लिम महिलांचे योगदान ठळकपणे अधोरेखित झाले आहे. तर प्राचार्य डॉ. ओमप्रकाश नायर म्हणाले की, फातिमा शेख यांनी आपल्या आयुष्याने हे सिद्ध केले की शिक्षण हीच सामाजिक परिवर्तनाची खरी गुरुकिल्ली आहे त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा आणि गुणांचा प्रसार करून पत्रकार वैभव स्वामी यांनी खऱ्या अर्थाने त्यांची जयंती स्तोत्र उपक्रमाने साजरी केली आहे.

फौजदार राजू गुळभिले म्हणाले की, त्या काळातील कठीण परिस्थितीतही न डगमगता शेख फातिमा या शिक्षण कार्यात फुले दांपत्या सोबत खऱ्या अर्थाने कार्यरत राहिल्या. लिंगभेद, धर्मभेद न मानता सर्वांसाठी त्यांनी शिक्षणाचा आग्रह धरला. अज्ञानाविरुद्ध शिक्षण हाच मार्ग मानणारी दृष्टी त्यांनी खऱ्या अर्थाने समाजाला दिली. आज त्यांच्या जयंतीचे आयोजन बेघर निवारा केंद्रात पत्रकार वैभव स्वामी यांनी आयोजित करून खऱ्या अर्थाने आदर्शवत सामाजिक दायित्व इतरांसमोर उभे केले आहे असे मत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यवस्थापक राजू वंजारे यांनी केले तर प्रस्ताविक जिव्हाळा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य यांनी विस्तृतपणे केले. कार्यक्रमाचे आभार महिला काळजीवाहक छाया सरोदे यांनी मानले. कार्यक्रमास निराधार वंचित घटकातील लाभार्थी यासह या घटकांना न्याय मिळावा यासाठी कार्यरत असलेली मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### फातिमा शेख यांची जयंती साजरी करून सामाजिक ऐक्याचा संदेश दिला – रेहाना पठाण

त्या काळात महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक लढ्यामध्ये खांद्याला खांदा लावून फातिमा शेख यांनी स्त्री शिक्षणाला उजाळा दिला. अल्पसंख्यांक समाजातील त्या पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या. मात्र दुर्दैवाने त्या आजपर्यंत दुर्लक्षित झाल्या होत्या. आजही त्यांची जयंती सार्वजनिक स्वरूपात साजरी होत नाही याची खंत आहे. मात्र पत्रकार वैभव स्वामी यांनी फातिमा शेख यांची जयंती जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात साजरी करून खऱ्या अर्थाने सामाजिक ऐक्याचा संदेश आणि पडद्यामागील कष्टकऱ्यांना न्याय दिला आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तथा सामाजिक कार्यकर्त्या रेहाना पठाण यांनी केले.

### चला अशिक्षितांना साक्षर करू या – वैभव स्वामी

आज २१ व्या शतकामध्ये जग आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर प्रगतीच्या नेत्रदीपक पटलावर यश मिळवत आहे. दुसरीकडे आजही भारतामध्ये विशेषता महाराष्ट्रात अशिक्षितांचे, निरक्षकांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. या निरक्षतेचा गैरफायदा साक्षर असलेले लोक करून घेतात आणि निरक्षकावर कायम अन्याय होतो.हा न्याय दूर करण्यासाठी आपल्या बीड शहरासह जिल्ह्यामध्ये जे निरक्षर आहेत त्यांना साक्षर करण्यासाठी पत्रकार संघ पुढाकार घेणार आहे. या सामाजिक समतोल साधनाऱ्या विधायक उपक्रमात बीड जिल्ह्यातील पत्रकारांसह सामाजिक कार्याचा वसा घेतलेल्या सुजाण नागरिकांनी निरक्षरांना साक्षर करण्याचा प्रयत्न आपल्या आपल्या पद्धतीने करून या चळवळीत सहभागी व्हावे असे आवाहन पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख तथा दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी केले आहे.

# बीडमध्ये १२ जानेवारी रोजी मोफत त्वचारोग तपासणी शिबिर

## ‘होलिस्टीक स्किन क्लिनिक’चा स्तुत्य उपक्रम

प्रतिनिधी @ बीड

मकर संक्रांतीच्या उत्सवाचे औचित्य साधून बीड शहरातील जालना रोडवरील 'होलिस्टीक स्किन क्लिनिक' येथे मोफत त्वचारोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सोमवार, १२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत संपन्न होणार असून, प्रसिद्ध त्वचारोग तज्ज्ञ डॉ. मोहिनी भागवत (आळणे) (एम.बी.बी.एस., एम.डी. स्किन) रुग्णांची मोफत तपासणी करणार आहेत.

या शिबिरामध्ये त्वचा, केस आणि नखांच्या विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन व उपचार सुचवले जातील. यामध्ये प्रामुख्याने गजकर्ण, सोरियासिस, कोड, एक्झिमा, पुरळ, नागिण, वांग, काळे डाग, आणि कोरड्या त्वचेच्या तक्रारी असलेल्या रुग्णांची तपासणी केली जाईल. तसेच केस गळणे, चाई, केसांतील कोंडा, नखांचे आजार आणि पिंपल्स (मुरुम) यांसारख्या समस्यांवरही यावेळी विशेष सल्ला दिला जाणार आहे.

या क्लिनिकमध्ये उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक सुविधा जसे की, रेडिओ फ्रिक्वेन्सीद्वारे मसा व चामखीळ काढणे, केमिकल पीलिंग, डर्मा रोलर, मायक्रोनीडलिंग, लेझर उपचार आणि पी.आर.पी. थेरपी यांबाबतही रुग्णांना माहिती दिली जाईल. हे शिबिर आळणे हॉस्पिटल बिल्डिंग, जालना रोड, बीड येथे होणार आहे. शिबिराचा लाभ घेण्यासाठी नाव नोंदणी करणे आवश्यक असून, इच्छुकांनी ०२४४२-२९९१५८ किंवा ९०७५८०६०७५ या क्रमांकावर संपर्क साधावा. या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांनी शिबिराचा लाभ घ्यावा – वैभव स्वामी



त्वचा, केस आणि नखांच्या विविध आजारांवर या शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन व उपचार सुचवले जाणार आहेत. प्रसिद्ध त्वचा तज्ञ डॉ. मोहिनी भागवत आळणे यांनी आयोजित केलेल्या या शिबिरामध्ये पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना विनामूल्य तपासले जाणार असून योग्य ते उपचार सांगितले जाणार आहेत. तेव्हा या शिबिराचा बीड जिल्ह्यातील पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांनी लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख तथा संपादक वैभव स्वामी यांनी केले आहे.

# पहिल्यांदाच यशस्वी ऑर्गन रिट्रीव्हलमुळे वैद्यकीय क्षेत्रात जालना जिल्ह्याचा मान उंचावला



डॉ.बळीराम बागल यांचा फिजिशियन असोसिएशनतर्फे गौरव

प्रतिनिधी @ जालना

दि.९ जानेवारी २०२६ जालना जिल्ह्याच्या वैद्यकीय इतिहासात एक सुवर्णाक्षरांनी नोंद होईल अशी कामगिरी बजावत जिल्ह्यात प्रथमच अत्यंत यशस्वी व उल्लेखनीय ऑर्गन रिट्रीव्हल अवयव संकलन प्रक्रिया पार पाडल्याबद्दल संजीवनी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल जालना येथील संचालक डॉ. बळीराम बागल यांचा फिजिशियन असोसिएशन ऑफ जालना यांच्या वतीने सन्मानपूर्वक गौरव करण्यात आला.

ही ऐतिहासिक ऑर्गन रिट्रीव्हल प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध शास्त्रीय तसेच नैतिक पद्धतीने यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली.या कार्यामुळे अनेक गंभीर रुग्णांना नवजीवन मिळण्याची आशा निर्माण झाली असून जालना जिल्ह्याचे नाव वैद्यकीय क्षेत्रात गौरवाने घेतले जात आहे.फिजिशियन असोसिएशन ऑफ जालना यांच्या वतीने आयोजित सतत वैद्यकीय शिक्षण (उचए) कार्यक्रमात हा गौरव सोहळा संपन्न झाला.यावेळी उपस्थित मान्यवर डॉक्टरांनी डॉ.बळीराम बागल यांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले.तसेच अवयवदान चळवळ ग्रीन कॉरिडोर संकल्पना आणि आपत्कालीन वैद्यकीय समन्वय यांची यशस्वी अंमलबजावणी करण्यात डॉ. बागल यांनी दिलेल्या योगदानाबद्दल विशेष अभिनंदन करण्यात आले.

या उल्लेखनीय कार्यामुळे केवळ वैद्यकीय क्षेत्रालाच नव्हे तर समाजात अवयवदानाबाबत सकारात्मक जनजागृती निर्माण होण्यासही मोठी मदत झाली असून भविष्यात जालना जिल्ह्यातून अशाच अनेक जीवनदायी उपक्रमांची प्रेरणा मिळेल असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

# परळी पालिकेत राष्ट्रवादीने एमआयएमला गटातून हाकलावे - सचिन मुळूक

## अन्यथा शिवसेना गटातून बाहेर पडेल आणि बाहेरून पाठिंबा देईल

प्रतिनिधी @ बीड

परळी नगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपच्या महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवून सत्ता स्थापन केली. मात्र सत्तास्थापनेनंतर गटनेता निवडीच्या प्रक्रियेत शिवसेनेला विश्वासात न घेता एमआयएमला गटात सामावून घेण्यात आल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी दिली. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेत्यांनी तातडीने एमआयएमला गटातून वगळावे, अन्यथा शिवसेनेला गटातून बाहेर पडण्याची परवानगी द्यावी; आम्ही बाहेरून पाठिंबा देऊ, अशी स्पष्ट भूमिका मुळूक यांनी शुक्रवारी (दि. १०) पत्रकार परिषदेत मांडली. यावेळी परळी तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे, शहर प्रमुख वैजनाथ माने उपस्थित होते.

बीड येथील सह्याद्री निवासस्थानी झालेल्या पत्रकार परिषदेत मुळूक म्हणाले की, परळी नगरपालिका निवडणुकीत महायुतीच्या माध्यमातून विजय मिळाला. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे १६, भाजपचे ७ तर शिवसेनेचे २ नगरसेवक निवडून आले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचा संयुक्त गट स्थापन करण्यात आला. मात्र गटनेता



निवडीसाठी नगरसेवकांच्या नावांसमोर पक्षनिहाय उल्लेख न केलेले पत्र जिल्हाधिकाऱ्यांसमोर सादर करण्यात आले. याची शिवसेनेला याबाबत माहिती मिळाली नाही. तसेच एमआयएमला गटात समाविष्ट करण्याबाबतही शिवसेनेला पूर्व कल्पना दिली नसल्याचे मुळूक यांनी सांगितले. त्यामुळे या प्रक्रियेशी शिवसेनेचा कोणताही संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने राजकीय स्पष्टता दाखवून एमआयएमला गटातून वगळावे. अन्यथा शिवसेनेला गटातून बाहेर पडण्याची परवानगी द्यावी; आम्ही बाहेरून पाठिंबा देऊ, असेही मुळूक म्हणाले.

जिल्हाधिकाऱ्यांकडे सोमवारी म्हणणे मांडणार

परळी पालिकेतील गटनेता निवडीदरम्यान शिवसेनेला अंधारात ठेवून एमआयएमच्या नगरसेवकाला गटात घेण्यात आले. या प्रकरणी वरिष्ठ नेत्यांच्या सूचनेवरुन सोमवारी (दि.१२) जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार आहोत. यावेळी शिवसेनेच्या दोन्ही नगरसेवकांच्या सह्यांनी शपथपत्र सादर करून अधिकृत भूमिका मांडण्यात येईल, असे मुळूक यांनी सांगितले.

दानवेंनी स्वतःचे डोके तपासावे..

परळी पालिका निवडणुकीत १६ नगरसेवक निवडून आल्याने राष्ट्रवादी सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. यामुळे गटनेता राष्ट्रवादीचा होणार हे सर्वश्रुत आहे. ही साधी बाब विरोधी पक्षनेता राहिलेल्या अंबादास दानवे यांना कळत नसेल तर त्यांनी स्वतःचे डोके तपासून घ्यावे. परळीत त्यांचा पक्ष औषधालाही राहिला नाही. दानवेंनी स्वतःचा पक्ष कसा वाढेल यावर लक्ष केंद्रीत करावे. उबाठाने संभाजीनगरमध्ये रशिद मामू सारख्या दंगलखोर उमेदवारला उमेदवारी दिली. याचा प्रचार करताना अंबादास दानवे यांना लाज वाटत नाही का असेही मुळूक म्हणाले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आष्टीत आजपासून भव्य श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचा शुभारंभ

आष्टी - (प्रतिनिधी) आमदार सुरेश धस प्रतिष्ठानच्या वतीने आष्टी येथे दिनांक ११ ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत भव्य दिव्य स्वरूपातील श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, आज या सोहळ्याचा शुभारंभ होत आहे. या धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमासाठी संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री व आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून हा उपक्रम साकार होत असून, देवदास स्वामी मठ, दादेगाव येथील परमपूजनीय महंत मंदार महाराज रामदासी हे श्रीराम कथेचे निरूपण करणार आहेत. कार्यक्रमासाठी आष्टी पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात १५० बाय ३०० फुटाचा भव्य मंडप उभारण्यात आला असून, ध्वनिव्यवस्था, प्रकाशयोजना आणि भाविकांसाठी बसण्याची सोय अंतिम टप्प्यात आहे. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून, स्वागत, शिस्त, प्रसाद वाटप, वाहनतळ, आरोग्य व स्वच्छतेचे नियोजन करण्यात आले आहे.




कार्यक्रमाच्या पूर्वसंध्येला भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

दिनांक ११ रोजी सकाळी ८ वाजता पुण्याहवाचन, कलश पूजन व देवता स्थापना होणार असून, त्यानंतर छत्रपती संकुल येथून शोभायात्रेला सुरुवात होईल. ही शोभायात्रा अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, शनी चौक, मुख्य रस्ता कमान वेस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, महात्मा फुले चौक, महावीर चौक मार्गे पुन्हा पंचायत समिती प्रांगणात येऊन संपन्न होणार आहे. त्यानंतर स्तंभ पूजन, ग्रंथ पूजन व कथेचा प्रारंभ होईल.दररोज दुपारी १२.३० ते सायंकाळी ४ या वेळेत कथा होणार असून, मकर संक्रांतीच्या दिवशी (१४ जानेवारी) सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत विशेष कथा आयोजित करण्यात आली आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने परिसरातील २० ते २५ गावांतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचा अंदाज आहे. याविषयी माहिती देताना आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, श्रीराम कथेच्या माध्यमातून समाजात भक्ती, संस्कार आणि सद्विचारांचा प्रसार व्हावा, हा आमचा उद्देश आहे. सर्व भाविकांनी कुटुंबासह उपस्थित राहून या आध्यात्मिक पर्वणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# आष्टी ग्रामीण रुग्णालयात दुर्बिणीद्वारे गर्भपिशवी शस्त्रक्रियेची ऐतिहासिक सुरुवात

आष्टी (प्रतिनिधी) आष्टी ग्रामीण रुग्णालयात आधुनिक वैद्यकीय सुविधांचा नवा अध्याय सुरू झाला असून, दुर्बिणीद्वारे (लॅप्रोस्कोपी) गर्भाशयातील पिशवीचे निदान व शस्त्रक्रिया करण्याची सुविधा सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत पहिल्या रुग्णावर बुधवार, दि. ७ रोजी यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. ही शस्त्रक्रिया पूर्णपणे यशस्वी ठरल्याची माहिती ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे यांनी दिली.

तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात पहिल्यांदाच लॅप्रोस्कोपीद्वारे गर्भाशयातील पिशवी काढण्याची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली आहे. या शस्त्रक्रियेचा लाभ ब्रम्हगाव येथील आशा पिंगळे (वय ४० वर्षे) या



महिलेला झाला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्यात आलेल्या या शस्त्रक्रियेमुळे रुग्णाला कमी वेदना, कमी रक्तस्राव आणि लवकर बरे होण्याचा लाभ मिळाला आहे. सदर शस्त्रक्रिया वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. प्रकाश आघाव यांनी यशस्वीपणे पार पाडली. यावेळी ग्रामीण रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी, परिचारिका तसेच इतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या समन्वयामुळे ही ऐतिहासिक कामगिरी यशस्वी ठरली.

ग्रामीण महिलांसाठी मोठा दिलासा

या अत्याधुनिक सुविधेमुळे आता ग्रामीण भागातील महिलांना मोठ्या शहरात किंवा खासगी रुग्णालयात जाण्याची गरज भासणार नाही. यामुळे वेळेची बचत तर होईलच, शिवाय उपचारांचा आर्थिक भारही मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. लॅप्रोस्कोपीद्वारे शस्त्रक्रिया केल्याने रुग्ण लवकर दैनंदिन जीवनात परतू शकतो, हे या तंत्रज्ञानाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. आष्टी ग्रामीण रुग्णालयात येथून पुढे टप्प्याटप्प्याने आणखी अद्ययावत वैद्यकीय सुविधा सुरू करण्यात येणार असल्याचे डॉ. मोराळे यांनी सांगितले. या यशामुळे तालुक्यातील आरोग्यसेवेला नवी दिशा मिळाली असून, ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. आधुनिक सुविधा ग्रामीण भागातच उपलब्ध झाल्याने रुग्णालयाबद्दल नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

# दुधना नदीपात्रात अवैध वाळू माफियांवर महसूलचा घणाघात

## शासकीय कामात अडथळा ; ट्रॅक्टर पळवून नेणाऱ्या सराईत गुन्हेगारावर गुन्हा एमपीडीए,तडीपारीची कारवाई होणार-तहसीलदार विजय चव्हाण

अंबड /प्रतिनिधी

दि.१० जानेवारी २०२६ अंबड तालुक्यातील दुधना नदीपात्रामध्ये सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खननावर महसूल प्रशासनाने धाडसी व धडाकेबाज कारवाई करत वाळू माफियांची झोप उडवली आहे.गोपनीय माहितीनुसार तहसील कार्यालयाच्या पथकाने घटनास्थळी अचानक धाड टाकली असता अवैध गौण खनिज वाळू उत्खनन व वाहतूक सुरू असल्याचे उघडकीस आले.

शासकीय पथकावर हुज्जत शिवीगाळ ट्रॅक्टर पळवून नेल्याचा धक्कादायक प्रकार महसूल पथक घटनास्थळी पोहोचताच रोहित संजय जगताप व त्याचे इतर साथीदार वाळूचे अवैध उत्खनन करून ट्रॅक्टरद्वारे वाहतूक करताना आढळून आले. पथकाने अधिकृत परवान्याची विचारणा केली असता आरोपींकडे कोणताही वैध परवाना नसल्याचे निष्पन्न झाले.कायदेशीर कार्यवाहीसाठी वाळूने भरलेले ट्रॅक्टर ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरू असतानाच आरोपी रोहित जगताप याने महसूल अधिकाऱ्यांशी आरेरावी करत हुज्जत घातली अश्लील शिवीगाळ केली व शासकीय कामात अडथळा निर्माण केला. एवढ्यावरच न थांबता त्याने जबरदस्तीने वाळूने भरलेले ट्रॅक्टर घटनास्थळावरून पळवून नेल्याने परिसरात खळबळ उडाली.सराईत गुन्हेगारावर गुन्हा दाखल या गंभीर प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात आरोपी रोहित संजय जगताप व त्याच्या साथीदारांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.विशेष म्हणजे रोहित जगताप हा सराईत गुन्हेगार असून यापूर्वीही




त्याच्यावर अवैध वाळू उपसा प्रकरणी अंबड तहसील कार्यालयामार्फत गुन्हे दाखल आहेत. दंडात्मक कारवाई सुरू असतानाही त्याने पुन्हा कायद्याला आव्हान देत हा गुन्हा केल्याचे स्पष्ट झाले आहे.

अवैध वाळू माफियांना प्रशासनाचा इशारा

अवैध वाळू उत्खनन करणाऱ्या माफियांना आणि शासकीय कामात अडथळा आणणाऱ्या गुंडांना अजिबात गय केली जाणार नाही. केवळ गुन्हा दाखल करून प्रशासन थांबणार नाही.भविष्यात एमपीडीए (चझऊ-) किंवा तडीपारीसारखी कठोर कारवाई प्रस्तावित केली जाईल असा कडक इशारा तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिला.अंबड तालुक्यात यापुढे कोणतेही अवैध धंदे खपवून घेतले जाणार नाहीत असा स्पष्ट संदेश प्रशासनाने दिला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली धडाकेबाज कारवाई सदर कारवाई माननीय जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी श्रीमती असीमा मित्तल,अप्पर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ व उपविभागीय दंडाधिकारी श्री.उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली, तहसीलदार श्री.विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या पथकात तलाठी श्री.स्वप्नील खरात,श्री.श्याम विभूते,श्री. रमेश वालेकर,श्री.विकास डोळसे,श्री.गोपाळ गाडेकर यांचा समावेश होता.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेला सरस्वती महाविद्यालय केजच्या माजी प्राचार्य रोहिणी गजेंद्रगडकर यांची सदिच्छा भेट

केज/प्रतिनिधी

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेला सरस्वती महा विद्यालय केजच्या माजी प्राचार्या श्रीमती रोहिणी गजेंद्रगडकर-काळे मॅडम यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांशी शैक्षणिक हितगुज केले व विद्यार्थ्यांना शिक्षण विषयी मार्गदर्शन केले. तसेच त्यांच्या सोबत आलेले त्यांचे यजमान श्री.शामराव भाऊराव काळे साहेब केज चे सेवानिवृत्त सबपोष्टमास्तर यांनीही विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी मार्गदर्शन केले.या दोघांनी या शाळे तील सर्वशिक्षक,शिक्षिका वृंदांना मार्गदर्शन करुन पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या.या शाळे तील लोकनेते मा.आ.कै. बाबुरावजी आडसकर साहेब यांच्या स्मरणार्थ आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ प्राप्त शिक्षक श्री. आबासाहेब तुळशीराम धपाटे सर यांचा



सत्कार केला.श्रीमती गजेंद्रगडकर मॅडम या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची या शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांच्या शिक्षिका होत्या.या दांपत्याचे शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन आदर सत्कार करुन सन्मानित करण्यात आले.त्यांनी कुंबेफळ येथील श्री सिद्धि विनायक गणपतीचे दर्शन दर्शन घेतले.शेवटी श्री. आबासाहेब तुळशिराम धपाटे सरांनी आभार मानले.या शाळेतील प्राथमिक पदवीधरशिक्षक डॉ.श्री.रामकिशन मुळे सर,आकाश लोंढे सर, राहुल बजरंग बचुटे सर, प्राथमिक पदवीधरशिक्षक श्री.संदीप मेघराज ठोंबरे सर,श्रीमती भोरे निलावती आनंदराव मॅडम,श्रीमती उटीकर अंजली गोविंदराव मॅडम, ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम आदी शिक्षकवृंद उपस्थित होते.



बीड/प्रतिनिधी

अंबाजोगाई येथे दिव्यांग मुलांमुलींची जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये खिंडकर यशराज हरिश्चंद्र या दिव्यांग विद्यार्थ्याने गोळा फेक व १०० मीटर धावणे या स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळवला आहे. या वेळी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्रीमती प्रिया राणी पाटील व वै.स.का.नखाते यांच्या हस्ते ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक तांदळे व क्रीडाशिक्षक फारुकी हे उपस्थित होते. तसेच शाळेवरही हरिओम शिक्षण प्रसारक मंडळ संचालित आदर्श मतिमंद निवासी विद्यालयाचे अध्यक्ष व सचिव आदिनाथ सुर्वे व विजयकुमार सुर्वे यांच्या हस्ते विद्यार्थी यांचा व कला शिक्षक फारूकी मुख्याध्यापक सुरेश तांदळे यांचाही सत्कार करण्यात आला.यावेळी शाळेचे सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

## अंबाजोगाईचा सांस्कृतिक वारसा जोपासणारा बालझुंबड उपक्रम - पत्रकार प्रतिक कांबळे

# बालझुंबडचा समारोप ; समुह नृत्य स्पर्धेस विद्यार्थी संघांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही सलग २६ व्या बालझुंबड मधील समुह नृत्य स्पर्धा शुक्रवार, दिनांक ०९ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती. समुह नृत्य स्पर्धेने यावर्षी बालझुंबडचा समारोप झाला. संयोजक तथा मंडळाचे अध्यक्ष राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभागप्रमुख दिनकर जोशी व बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्या संकल्पनेतून आयोजित समुह नृत्य स्पर्धेत एकूण ३६ विद्यार्थी संघांनी विविध विषयांवर आधारित गीतांवर आपले बहारदार सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ऍड.दयानंद लोंढाळ हे तर प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक महेश कदम, पत्रकार प्रतिक कांबळे (आयोजक, चंपावती महोत्सव, बीड.), सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले आणि परिक्षक म्हणून नृत्य विशारद आकांक्षा ढगे, नृत्य विशारद साक्षी विडेकर, प्रशांत कुमार (प्राचार्य, न्यु व्हिजन पब्लिक स्कूल.) यांची उपस्थिती होती. पुज्य सानेगुरूजी यांच्या प्रतिमेचे पुजन, दीपप्रज्ज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मान्यवरांचा सत्कार संयोजक समितीच्या वतीने करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रख्यात पत्रकार प्रतिक कांबळे यांनी सांगितले की, बीड जिल्हा हा कलाकारांचा बालेकिल्ला तर अंबाजोगाई ही खाण आहे. बालझुंबड हे एक चांगले व्यासपीठ आहे. आजकाल आपल्या मुलांनी खूप शिकून डॉक्टर, इंजिनिअर झाले पाहिजे याकडे पालकांचा ओढा दिसून येतो. पण, मी अशा पालकांना सांगू इच्छितो की, आपण मुलांना खूप शिकवा, परंतु, मुलांमधील सुप्त कलागुणांना वाव द्या, त्यांना कलाकार बनायला प्रोत्साहन द्या, प्रत्येक मुला व मुलीच्या अंगी एखादी कला हवी, कारण, ज्याच्या अंगी एखादी कला असते तो भविष्यात आपले आयुष्य आनंदाने जगू शकतो. कला माणसाच्या अंतर्मनाचा ठाव घेते. आजचे परिक्षक हे बालझुंबडचे माजी विजेते आहेत. संयोजक पापा मोदींच्या संकल्पनेतून मागील २५ वर्षांपासून सातत्याने सुरू असलेला बालझुंबड हा उपक्रम अंबाजोगाईचा सांस्कृतिक वारसा जोपासणारा आहे असे गौरवोद्गार पत्रकार कांबळे यांनी काढले. तर




यावेळी बोलताना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले म्हणाले की, बालझुंबड हा माईलस्टोन उपक्रम आहे. पापा मोदी यांची प्रेरणा व दिनकर जोशी यांची संकल्पना आणि संयोजन समितीचे उत्तम टीमवर्क यामुळे हा उपक्रम आगळ्यावेगळ्या उंचीवर पोहचला आहे. बालझुंबड हे एक सक्षम व्यासपीठ आहे. येथे मुलांच्या कलागुणांना वाव मिळतो. जीवन आनंदाने जगण्यासाठी कलागुण आवश्यक असतात. त्यामुळे स्पर्धक विद्यार्थ्यांनी आपले कलागुण ओळखून ते जोपासत पुढे जावे आणि आनंदी आयुष्य जगावे असे आवाहन करून डॉ.इंगोले यांनी बालझुंबड समुह नृत्य स्पर्धेतील सहभागी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना नगरसेवक महेश कदम यांनी सांगितले की, मागील २५ वर्षांपासून मोदी साहेबांच्या प्रेरणेतून अव्याहतपणे सुरू असलेल्या बालझुंबडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व विकास घडवून आणणे, प्रगतीसाठी हा उपक्रम खूप महत्त्वाचा आहे. समुह नृत्य स्पर्धेतून विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्यांचा विकास होतो. विद्यार्थ्यांनी स्पर्धेत यश प्राप्त करावे आणि विविध क्षेत्रात करिअर करण्यासाठी ज्ञान संपादन करावे, मुलांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन नगरसेवक कदम यांनी केले. तर अध्यक्षीय समारोप करताना ऍड.दयानंद लोंढाळ यांनी सांगितले की, बालझुंबड ही स्पर्धा सातत्याने २६ वर्षे होत आहे. मोबाईल पासून मुलांना दूर ठेवण्यासाठी बालझुंबड सारख्या स्पर्धा दिशादर्शक ठरतात. संयोजक राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभागप्रमुख दिनकर जोशी, कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्या संकल्पनेतून हा अभिनंदनीय उपक्रम सुरू असल्याचे सांगून भविष्यात बालझुंबड मधून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट कलावंत, खेळाडू, चित्रकार, वैज्ञानिक निर्माण व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त करून बालझुंबडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी, त्यांचा व्यक्तीमत्व विकास व्हावा, याकरिता हा उपक्रम खूप महत्त्वाचा आहे. बालझुंबड म्हणजे अंबाजोगाई तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांचे एकत्रित स्नेहसंमेलन होय. त्यामुळे पालकांनी यापुढेही असाच प्रतिसाद देवून बालझुंबड स्पर्धा यशस्वी करावी अशी अपेक्षा ऍड.लोंढाळ यांनी व्यक्त केली. बालझुंबड २०२६ समुह नृत्य स्पर्धा उद्घाटन सत्राचे सुत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार समन्वयक राजेश कांबळे यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी समन्वयक राजेश कांबळे, मुख्याध्यापक आनंद टाकळकर, मुख्याध्यापक तथा प्राचार्य विनायक मुंजे, पाटील मॅडम, संध्या सोळंके, सोमवंशी सर, मंगेश बलुतकर, सय्यद शफीक, खरात सर, विजय तट, विकास शिंदे यांच्यासोबत प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाचे पदाधिकारी विजय रापतवार, सचिन जाधव, विशाल जगताप यांनी परिश्रम घेतले.

## बालझुंबड हा माईलस्टोन - मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

### समुह नृत्य स्पर्धेत बहारदार सादरीकरण :

विद्यार्थ्यांनी आपल्यातील सांघिक कलागुणांना वाव देत समुह नृत्य स्पर्धेत विविध प्रकारच्या गीतांवर आधारित नृत्य सादर केले. यात मुलींचा मोठा सहभाग होता. ही स्पर्धा शुक्रवारी तीन गटात आयोजित करण्यात आली होती. समुह नृत्य स्पर्धेत एका शाळेतील गटनिहाय एकच संघ सहभागी झाला होता. प्रत्येक स्पर्धक संघाला त्यांच्या सादरीकरणासाठी ५ मिनिटांचा अवधी दिला होता. यात अनेक स्पर्धकांनी आकर्षक पेहराव करून आपले नृत्य आविष्कार सादर केले. इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी या गटासाठी घेण्यात आलेल्या स्पर्धेत १० स्पर्धक संघ, इयत्ता ५ वी ते इयत्ता ७ वी या गटात १६ स्पर्धक संघ आणि इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी या गटात १० स्पर्धक संघ सहभागी झाले. तीनही गटांत एकूण ३६ स्पर्धक संघ सहभागी झाले. समुह नृत्य या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

# समानतेची शिकवण आणि संस्कार गरजेचे-सायली परांजपे

## मुलाच्या विकासात पालकांची अहम भूमिका - डॉ.विनोद वेदपाठक



परळी / प्रतिनिधी

तंत्रज्ञानाचा अविवेकी व विकृत वापर समाजात मोठया प्रमाणावर सुरू असून या परिस्थितीत आपल्या मुलांना समानतेची शिकवण आणि संस्कार देण्याची मोठी जबाबदारी पालक, शिक्षक, शाळा आणि समाजावर आलेली आहे. तंत्रज्ञानाच्या गैरवापराच्या या काळात माता पालकांनी अधिक जागरूक राहून खंबीर बनले पाहिजे असे प्रतिपादन सायली परांजपे यांनी केले तर बदलत्या जीवनशैलीत वयवर्षे १० ते १९ या दरम्यान पालकांनी मुलांसाठी वेळ द्यावा असे मत डॉ.विनोद वेडपाठक व्यक केले.

परळी तालुक्यातील मोहा येथील महाराष्ट्र प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्यावतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त शनिवार दि १० रोजी माता-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी लेखिका व विविध राष्ट्रीय दैनिकात उपसंपादिका म्हणून कार्य केलेल्या सायली परांजपे, मानवलोक अंबाजोगाई येथील कल्पना लोहिया, अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जनऔषध वैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विनोद वेदपाठक, डॉ.निधी मेहता, डॉ.मयुरी, सुदर्शन भोसले, संस्थचे सचिव ऑड.अजय बुरांडे, जेष्ठ संचालक सुदामदादा देशमुख, शाळेचे प्राचार्य मुरलीधर बोराडे आदी प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना परांजपे म्हणाले की, राजमाता जिजाऊ आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी दिलेला आदर्श पुढे घेऊन जाण्यापेक्षा त्याच्या विचारांच्या उलट दिशेला समाजाची वाटचाल सुरू असून या विदारक परिस्थितीत समाजातील सर्वच घटकांनी सामूहिक पालकत्व निभावने गरजेचे बनले आहे. तर डॉ.वेदपाठक यांनी मुलांच्या किशोरवयीन वयात होणारे बदल व याकाळात पालकांची जबाबदारी याचे महत्व उपस्थित पालकांना करून दिले. या माता-पालक मेळाव्याचे अध्यक्षीय समारोप संस्थेचे सचिव ऑड अजय बुरांडे यांनी केले या प्रसंगी राजमाता जिजाऊ यांनी १६ व्या शतकात स्वराज निर्मीतीची शिकवण देत सार्वभौमत्व रुजविण्यासाठी प्रयत्न केले मात्र विद्यमान काळात हुकूमशाही पद्धतीने वाटचाल सुरू असून या मध्ये विद्यार्थी व युवकावर मोठा अन्याय होण्याचे प्रमाण वाढले असल्याचे सांगितले.

या मेळावा प्रसंगी गावातील आणि परिसरातील माता-पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्तावित बालाजी कडभाने, सूत्रसंचलन गिरीश तोंडारे तर आभार व्यक्त प्राचार्य मुरलीधर बोराडे यांनी केले.

# श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावर भक्तीचा जनसागर

## संत वामनभाऊ महाराजांच्या ५० व्या पुण्यतिथीनिमित्त

## आ. सुरेश धस यांनी घेतले समाधी दर्शन



पाटोदा (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्याचे श्रद्धास्थान आणि वारकरी संप्रदायाचा मोठा वारसा लाभलेल्या श्री क्षेत्र गहिनीनाथ गड येथे संत शिरोमणी वामनभाऊ महाराज यांच्या ५० व्या पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी निमित्त राज्याचे माजी मंत्री तथा आमदार सुरेश धस यांनी गडावर उपस्थित राहून संत वामनभाऊ महाराजांच्या पवित्र समाधीचे दर्शन घेतले आणि अभिवादन केले.

भक्ती आणि शक्तीचा संगम

यावेळी गडावर दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. संत वामनभाऊ महाराजांच्या शिकवणीने समाजाला नेहमीच सद्यमार्गावर चालण्याची प्रेरणा दिली आहे. त्यांच्या ५० व्या पुण्यतिथीनिमित्त गडावर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. समाधी दर्शन घेतल्यानंतर आ. सुरेश धस यांनी उपस्थित भाविकांशी संवाद साधला आणि महाराजांच्या कार्याला उजाळा दिला.

'समाजसेवेसाठी नवी उमेद' - आ. सुरेश धस

दर्शनानंतर माध्यमांशी बोलताना आ. सुरेश धस म्हणाले की,संत वामनभाऊ महाराजांचे विचार आणि त्यांनी जोपासलेला भक्तीचा वारसा समाजाला योग्य मार्ग दाखवणारा आहे. त्यांच्या शिकवणीतून सेवाभाव, नम्रता आणि माणुसकीची मोठी प्रेरणा मिळते. या पवित्र स्थळी आल्यावर जी आध्यात्मिक ऊर्जा मिळते, ती समाजासाठी अधिक प्रामाणिकपणे आणि जोमाने काम करण्याची नवी उमेद देऊन गेली आहे.

गडावरील वातावरण भक्तिमय

पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त संपूर्ण गहिनीनाथ गड परिसरात 'वामनभाऊ महाराज की जय' अशा जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले होते. याप्रसंगी विविध राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह मोठ्या संख्येने वारकरी आणि भाविक उपस्थित होते. गडाचे महंत आणि उत्सव समितीच्या वतीने या सोहळ्याचे नेटके नियोजन करण्यात आले होते.

# अ.भा.साहित्य संमेलनात ड.विठ्ठलराव काष्टे यांच्या कवितेने रसिक भारावले



जाफ्राबाद / हरी भालके

सातारा येथील ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात जाफ्राबादचे कवी ड.विठ्ठलराव काष्टे यांचे काव्य वाचन झाले.त्यांनी आपल्या शिदोरी च्या भाकरी या काव्यसंग्रहातील कुटुंबातील बाई ही कविता सादर केली.त्यास रसिकांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

कुटुंबाचा कणा असलेली स्त्री स्वतःचे दुःख बाजूला सारून कुटुंबासाठी झिजते. मुलगी, सून ,नातवंडाची दाई, शेतात राबणारी लक्ष्मी अशा अष्टपैलू भूमिका समर्थपणे पेलणाऱ्या गृहिणीचे अत्यंत भावूक वर्णन ड.विठ्ठलराव काष्टे यांनी सादर करुन उपस्थितांना विचार करण्यास प्रवृत्त केले.अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात आपल्या काव्य प्रतिभेची छाप पाडल्या बद्दल ड. काष्टे यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.दरम्यान ग्रामीण संस्कृती,शेतकरी, कष्टकरी,महिला, यांचे यथार्थ वर्णन आपल्या कवितेतून मांडणारे ड.विठ्ठलराव काष्टे यांचे तुझ्या - माझ्यातले , शिदोरीच्या भाकरी हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत.

# पाटोदा येथील शिक्षक सलीम तांबोळी यांना उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते 'जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान



पाटोदा /प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात १९९८ पासून सलग २७ वर्षे निष्कलंक आणि समर्पित सेवा बजावणाऱ्या सलीम तांबोळी सर यांना बीड जिल्हा परिषदेचा मानाचा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे पाटोदा तालुक्यासह शैक्षणिक वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे.

सलीम तांबोळी सर यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत. १९९८ पासून आजतागायत त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या याच कार्याची दखल घेत शासनाने त्यांना २०२५ चा 'जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार' जाहीर केला होता.पुरस्कार स्वीकारल्यानंतर भावना व्यक्त करताना ते म्हणाले की, शिक्षक म्हणून केलेल्या प्रामाणिक सेवेला आज खऱ्या अर्थाने मान्यता मिळाली, हे माझे भाग्य समजतो. हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून माझ्या शाळेतील विद्यार्थी, सहकारी आणि कुटुंबाच्या पाठिंब्याचे फळ आहे. हा गौरव मला भविष्यात अधिक जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा देईल.

या सोहळ्याला जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदना होत आहे.

# आष्टी शहरासाठी १० एम.व्ही.ए.क्षमतेचा नवा ट्रान्सफॉर्मर दाखल

## आ.सुरेश धस यांच्या हस्ते विधीवत पूजन; कामास औपचारिक सुरुवात



आष्टी - (प्रतिनिधी) यापूर्वी छोटा ट्रान्सफॉर्मर मिळविण्यासाठीही मोठा संघर्ष करावा लागत होता. मात्र आता राज्याचे ऊर्जा खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असल्यामुळे आपल्या मतदारसंघात ट्रान्सफॉर्मर सहज आणि वेगाने मंजूर होऊन उपलब्ध होत आहेत. त्यांच्या दूरदृष्टीमुळे महावितरणमध्ये प्रभावी योजना राबविल्या जात असून येत्या काळात शेतकऱ्यांसाठी वीजपुरवठ्याच्या बाबतीत चांगले दिवस येणार असल्याचा विश्वास आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला. याआधी १३ आणि आता ११ असे एकूण २३ ट्रान्सफॉर्मर मंजूर झाल्याने मतदारसंघातील वीजेचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

मुख्यमंत्री सौर कृषी वीज वाहिनी २.० या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यांतील कृषी वीजपुरवठा अधिक सक्षम व सुरळीत करण्यासाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. आष्टी, पाटोदा, शिरूर आणि कासार तालुक्यांतील एकूण ११ वीज उपकेंद्रांमध्ये प्रत्येकी १० व ५ एम. व्ही.ए. क्षमतेचे अतिरिक्त पावर ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आले आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आज शनिवार (दि. १०) रोजी १० एम.व्ही.ए. क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर आष्टी शहरासाठी दाखल झाला. या ट्रान्सफॉर्मरचे आमदार सुरेश धस यांच्या हस्ते विधीवत पूजन करण्यात आले.

या नव्या ट्रान्सफॉर्मरमुळे कृषी पंपांना स्थिर वीजपुरवठा लोडशेडिंग व भार नियंत्रणात सुधारणा कमी व्होल्टेजची समस्या दूर शेतकऱ्यांना दिवसाच्या वेळेत दर्जेदार वीज

या सर्व बाबींना मोठा फायदा होणार असून परिणामी शेती उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही सकारात्मक बदल घडून येणार आहे. १० एम.व्ही.ए.क्षमतेचे अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, आष्टी, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, धानोरा, ५ एम.व्ही.ए. क्षमतेचे अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, सावरगाव, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, जळगाव (कडा कारखाना), ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, डोईठाण, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, कुसळंब, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, लांबरवाडी, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, कोतन, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, दासखेड, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, घाटशीळ - पारगाव, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, भायाळ या ठिकाणी नव्या क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार असून त्यापैकी आज आष्टी शहरात ट्रान्सफॉर्मर प्रत्यक्ष दाखल झाल्याने नागरिक व शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

यावेळी नगराध्यक्ष जिया बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, भाऊसाहेब भवर, महावितरणचे उपअभियंता शिवाजी देशमुख, महेश हंबर्डे, भाऊसाहेब निंबाळकर, सुनील मेहेर, बाळू शेठ मेहेर, भारत मुरकुटे, सुरेश वारगुळे, विठ्ठल शेंबडे, राजू निकाळजे, बाळासाहेब घोडके, शमशोद्दीन शेख, श्रेयस मेहेर, इरशान खान, अविनाश गिरी, राजेंद्र जोशी, अनंतदेवा जोशी, सुनील रेडेकर, राहुल मुथ्था, मनोज धनवडे, कपिल अग्रवाल, नितीन खिळे, गणेश पोकळे, अजित मुळे, सागर धोंडे, बबलू शेख, सतीश टकले यांच्यासह व्यापारी, पत्रकार, नागरिक व अनेक मान्यवर उपस्थित होते.

# अँड.विवेकानंद सानप यांना मातृशोक

## वृद्धापकाळाने श्रीमती कृष्णाबाई सानप यांचे दुःखद निधन

प्रतिनिधी @ बीड

जाणिव प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा मराठवाड्यातील जेष्ठ विधीज्ञ अँड.विवेकानंद शंकरराव सानप यांच्या मातोश्री श्रीमती कृष्णाबाई शंकरराव सानप यांचं दि.१० जानेवारी २०२६ शनिवारी पहाटे वृद्धपकाळाने चाणक्यपुरी,बीड येथे निधन झालं. त्या मृत्यूसमई ९३ वर्षाच्या होत्या.

दुपारी १ वाजता संत भगवानबाबा स्मशानभूमी,बार्शी रोड येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात १ मुलगा व २ मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सानप कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

# रांगोळीतून साकारली संत वामनभाऊ महाराजांची प्रतिमा

## चार क्विंटल रांगोळीचा केला वापर रोहिणी मिसाळच्या कलेचे सर्वत्र कौतुक



मानूर /प्रतिनिधी ह्व

वैराग्यमूर्ती संत वामनभाऊ महाराजांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी निमित्त गहिनीनाथ गडावर आणि संत वामनभाऊ महाराजांवर मनोभावे भक्ती असलेल्या भाविकांनी आपल्या परीने सेवा अर्पण केली आहे.सालाबादप्रमाणे याही वर्षी संत वामनभाऊ महाराजांवर निस्सिम भक्तिभाव असलेल्या भाविकांनी दातृत्वाच्या,सेवेच्या पद्धतीने सेवा दिली असून एका महिला गृहिणीने संत वामनभाऊ महाराजांची प्रतिमा रांगोळीतून साकारली असून सदरील रांगोळी पाहण्यासाठी आणि त्या रांगोळीची छबी आपल्या मोबाईल मध्ये टिपण्यासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केल्याचे दिसून आले.पाटोदा तालुक्यातील अंमळनेर जवळील मिसाळवाडी येथील रोहिणी अशोक मिसाळ यांनी जवळपास चार क्विंटल रांगोळीचा वापर करून संत वामनभाऊ महाराजांची हुबेहूब प्रतिमा साकारली आहे.एक हजार चौरस फूट जागेचा वापर करून सर्व प्रकारच्या रंगांच्या रांगोळीचा व्यवस्थितपणे वापर करून रांगोळी पूर्णत्वास गेली आहे.कलेची आवड सुरुवातीपासूनच जोपासणाऱ्या रोहिणी मिसाळ यांना या कामासाठी त्यांचे पती अशोक मिसाळ यांनी सहकार्य केले आहे.

# स्व.नामदेव पाटील पिवळ माध्यमिक विद्यालयात आंनद नगरी मेळावा उत्साहात साजरा



दावरवाडी /प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील नांदर येथील स्व नामदेव पाटील पिवळ माध्यमिक विद्यालय शाळेच्या प्रांगणात दि १० जानेवारी शनिवारी रोजी सकाळी ९ ते ११ या वेळामध्ये आंनदनगरी मेळाव्याचे छान प्रकारे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सूर्यकांत धुपे यांच्या हस्ते औपचारिक उद्धाटन करण्यात आले विविध शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी सध्याला हा मेळावा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक ठरला उद्धाटन समारंभात मान्यवरांचा विशेष सत्कार करण्यात आला असून त्यांच्या उपस्थितीमुळे ह्या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले या मेळाव्याचे यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या घरुन विविध प्रकारचे खाद्यपदार्थ तयार करून विकण्यासाठी आणले होते. व तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी लावलेल्या विविध स्टॉल्स कडे गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. या आंनदनगरीतुन विद्यार्थांना व्यवहारीक ज्ञान हे मिळाले, असुन विद्यार्थी आता संपूर्ण व्यवहारात हुशारीक ज्ञान येईल असे शाळेचे मुख्याध्यापक सुर्यकांत धुपे सर यांनी सांगितले आहे. यावेळी मुख्याध्यापक सुर्यकांत धुपे, व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर राजेंद्र थोरात, रामकृष्ण पातकळ, हरसिंग पाटील, बबन भावले, रमेश पवार, संजय गूलालकर, एम आगळे, पिवळ डी यु, श्रीमती सुरेखा राऊत, कर्मचारी गोरक्षनाथ सोनवणे, सतिश कदम, बबन ठेणगे, माऊली काळे व विद्यार्थी गावातील नागरिक यावेळी उपस्थित होते..

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सेवावृत्ती, त्यागवृत्ती व राष्ट्रभक्तीचे संस्कार घडतात - आमदार श्रीजयाताई चव्हाण

मुदखेड (प्रतिनिधी)

राष्ट्रीय सेवा योजनेच्या (रा. से. यो.) माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सेवावृत्ती, त्यागवृत्ती व राष्ट्रभक्ती यांसारख्या मूल्यांचे संस्कार घडतात. त्यातूनच आदर्श नागरिक घडतो, असे प्रतिपादन आमदार श्रीजयाताई अशोकरावजी चव्हाण यांनी केले.श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड संचलित राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित विशेष वार्षिक शिबिराचे उद्घाटन दि. ८ जानेवारी २०२६ रोजी मौजे अमादरीवडी (ता. भोकर, जि. नांदेड) येथे उत्साहात पार पडले. शिबिराचे आयोजन शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास या विषयावर करण्यात आले आहे.

उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार श्रीजयाताई चव्हाण म्हणाल्या की, युवकांनी पुस्तकांच्या सानिध्यात रमून चांगले विचार आत्मसात करावेत. त्या विचारांना सामाजिक कार्याची जोड मिळाल्यास माणुसकी जागृत होते. देश तरुणांचा आहे; मुलींची उच्च शिक्षणाकडे वाढती ओढ ही सकारात्मक बाब असून युवक-युवतींनी आपली ऊर्जा राष्ट्रहित व समाजविकासासाठी समर्पित करावी.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य नरेंद्र चव्हाण होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना स्वप्न पाहा, जीवनाचा उद्देश ठरवा आणि तो प्रामाणिकपणे पूर्ण करा असा संदेश दिला. प्रमुख पाहुणे सरपंच राजकुमार वागतकर यांनी एनएसएसमुळे गावातील तरुणांना दिशा मिळून विकासाला चालना मिळेल, असे सांगितले. प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांनी एनएसएस हे व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी व्यासपीठ असल्याचे नमूद केले.

प्रास्ताविकात कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रकाश कोथळे यांनी शिबिराच्या उद्दिष्टांची माहिती देत स्वच्छता, आरोग्य जनजागृती, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती, सामाजिक प्रबोधन व श्रमदान यांसारख्या उपक्रमांची रूपरेषा मांडली. सात दिवसांच्या या शिबिरात व्याख्याने, स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी, रक्तदान जनजागृती, श्रमदान व सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात येणार असून ५० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा संचालक प्रा. डॉ. अर्जुनसिंह ठाकूर यांनी केले तर आभार सहकार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सतीश उमाटे यांनी मानले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. आर. एस. कोंडेकर, डॉ. मयूर दरबेसवार, प्रा. सुलोचना माळवे, डॉ. बुशरा शेख,डी. सी. इंगोले, नारायण पवार यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.उद्घाटन समारंभास एनएसएस स्वयंसेवक, प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष शिबिराची यशस्वी सुरुवात झाल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.




## भाजप सर्कल प्रमुख पदी नितीन फाळके यांची नियुक्ती

तामसा (प्रतिनिधी)

हदगांव तालुक्यातील भाजप आष्टी सर्कल प्रमुख पदी युवा कार्यकर्ते नितीन फाळके यांची तालुका अध्यक्ष भागवत देवसरकर यांनी निवड केली असून फाळके यांच्या निवडीचं माजी मुख्यमंत्री व खासदार अशोक चव्हाण, जिल्हा अध्यक्ष ऍड किशोर देशमुख,महिला तालुका अध्यक्ष ममता जोशी, पदवीधर जिल्हा प्रकोष्ठ महेश मठपती यांनी स्वागत केलं व पुढच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नितीन फाळके यांच्या या निवडीमुळे आष्टी गणात भाजपा ला युवा संजीवनी मिळेल..

# यशासाठी पालकांचे स्वप्न उराशी बाळगून मेहनत करा : नवनिर्वाचित नगरसेविका अश्विनी कलगुटवार

### जिजाऊ-सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त राजकुंवर महिला महाविद्यालयात गौरव सोहळा

किनवट (प्रतिनिधी)

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ आणि स्त्री शिक्षणाच्या जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त राजकुंवर महिला महाविद्यालय, किनवट येथे अभिवादन कार्यक्रम व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महाविद्यालयाची विद्यार्थिनी अश्विनी किरण कलगुटवार हिची किनवट नगरपालिकेच्या नगरसेविकापदी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने तिचा सन्मान करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना नवनिर्वाचित नगरसेविका अश्विनी कलगुटवार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या म्हणाल्या, माझ्या जडणघडणीत राजकुंवर महिला महाविद्यालयाचे आणि ड. सुनील येरेकर यांच्या मार्गदर्शनाचे मोलाचे योगदान आहे. माझ्या राजकीय यशाचे श्रेय माझे वडील किरण कलगुटवार



यांना जाते. उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, डॉक्टर, इंजिनीअर किंवा प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न असेल, तर पालकांचे स्वप्न उराशी बाळगून कठोर परिश्रम आणि त्याग करण्याची तयारी ठेवावी लागते. पालकांचे पाठबळ मिळाल्यास कोणत्याही क्षेत्रात यश निश्चित साध्य करता येते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना ड. सुनील येरेकर यांनी महाविद्यालयाची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, ग्रामीण भागातील मुलींना मोफत व दर्जेदार शिक्षण मिळावे, त्या स्पर्धेच्या युगात सक्षमपणे उभ्या राहाव्यात, यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. विद्यार्थिनींच्या अंगभूत गुणांना वाव देत त्यांना स्पर्धात्मक दृष्टिकोनातून घडवणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे.यावेळी किरण कलगुटवार यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना परिश्रम, जिद्द आणि सातत्य यांच्या जोरावर कोणत्याही संकटावर मात करून यश मिळवता येते, असे प्रतिपादन केले.

गृहलक्ष्मी ग्रामीण विकास संस्थेच्या अध्यक्षा संगीताताई पाटील यांनीही मनोगत व्यक्त करताना, महिलांनी आपली सामाजिक भूमिका ओळखून आत्मविश्वासाने काम केल्यास यश साध्य करणे सहज शक्य असल्याचे सांगितले.कार्यक्रमाला आकाश सर, प्रा. पांडे मॅडम, औद्धिवार मॅडम, प्रा. पूजा गावात्रे, प्रा. कनाके, पठाण सर, कुराडे सर तसेच कविता जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वजीत भवरे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन ड. सुनील येरेकर यांनी केले.या सोहळ्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्या. उत्साही वातावरणात हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# रेणुकादेवी संस्थानला महिनाभरात १.१४ कोटींचे विक्रमी उत्पन्न

### ४.४११ किलो चांदी व ११८ ग्रॅम सोने दान स्वरूपात प्राप्त

किनवट । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील देवीच्या साडेतीन शक्तीपीठांपैकी पूर्ण शक्तीपीठ म्हणून ओळख असलेल्या माहूरगडावरील श्री रेणुकादेवी संस्थानसाठी डिसेंबर २०२५ महिना ऐतिहासिक ठरला आहे. अवघ्या एका महिन्यात संस्थानला १ कोटी १४ लाख २० हजार ८९९ रुपये इतके विक्रमी रोख उत्पन्न, तसेच ४ किलो ४११ ग्रॅम ७८० मिली चांदी व ११८ ग्रॅम सोने दान स्वरूपात प्राप्त झाले आहे.

बुधवार, दि. ७ जानेवारी २०२६ रोजी श्री रेणुकादेवी संस्थानच्या कार्यालयात संस्थानातील एकूण ११ दानपेट्या उघडून मोजदाद करण्यात आली. या मोजदादीत दानपेट्यांमधून २५ लाख ३२ हजार ३९८ रुपये रोख, ९६ ग्रॅम ५०० मिली सोने, सोन्याच्या ४७ नथा, तसेच २ किलो २१० ग्रॅम चांदीचे दागिने प्राप्त झाले.

डिसेंबर महिन्यात नाताळच्या



सुट्ट्या, वर्षअखेरीस व नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर देशभरातून लाखो भाविकांनी माहूरगडावर दर्शनासाठी हजेरी लावली. विशेषतः कुटुंबासह आलेल्या भाविकांची संख्या मोठी असल्याने दर्शन, देणग्या व पूजासाहित्य खरेदीत वाढ झाली. त्यामुळे हा महिना संस्थानच्या इतिहासातील विक्रमी व सुवर्णाक्षरी ठरणारा महिना ठरला आहे.सदर दानपेट्यांची मोजदाद पूर्ण पारदर्शकतेने व व्हिडीओ चित्रीकरणात पार पडली. यावेळी तहसीलदार अभिजीत जगताप, संस्थानचे विश्वस्त चंद्रकांत भोपी, संजय कान्नव, दुर्गादास भोपी, बालाजी जगत, संस्थान व्यवस्थापक योगेश साबळे व सहाय्यक व्यवस्थापक नितीन गेडाम यांची उपस्थिती होती. संस्थानला मिळालेल्या या विक्रमी उत्पन्नातून भाविकांच्या सोयीसुविधा, दर्शन व्यवस्था, स्वच्छता, सुरक्षा, पायाभूत सुविधा तसेच विकासकामांना अधिक गती देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. साडेतीन शक्तीपीठांपैकी पूर्ण पीठ असलेल्या श्रीक्षेत्र माहूरगडावरील श्री रेणुकामाता संस्थानच्या भक्ती, श्रद्धा व विश्वासाची हीच खरी साक्ष असून, येत्या काळातही भाविकांचा ओघ असाच वाढत राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# शिवाजी हायस्कूल विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी मुरलीधर घोरबांड यांची तर उपमुख्याध्यापक पदी मोरे यांची निवड

कंधार (प्रतिनिधी)

येथील गणित विषयाचे तज्ञ अध्यापक प्रा.मुरलीधर घोरबांड यांच्या कार्याची दखल घेऊन श्री शिवाजी माध्यमिक,उच्च माध्यमिक विद्यालय कंधार येथे उपमुख्याध्यापक ते मुख्याध्यापक म्हणून संस्थेने त्यांना पदौन्नती दिली आहे.घोरबांड यांनी यापूर्वी जिल्ह्याला अध्यापन केले असता तेथे जीनिएस बॅचच्या माध्यमातून तेथील अनेल मुलांना इंजिनीअर, डॉक्टर घडवले आहे.गावखेड्यातील विद्यार्थी चमकला पाहिजे हाच उद्देश समोर ठेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थीप्रती तळमळ, गाव वाडी तांड्यातील विद्यार्थी गणित विषयात तरबेज झाला पाहिजे हा उदांत हेतू समोर ठेऊन शिक्षण देण्याचा ध्यास घेतला आहे. मेहनत, शिस्तबद्ध आणि विद्यार्थ्यांना समजेल उमजेल अशा



प्रकारचे शिक्षण देणारे गणित विषयाचे तज्ञ अध्यापक म्हणून जिल्ह्यासह परिसरात यांना ओळखले जाते.

प्रत्येक विद्यार्थी स्वतंत्र तेज,बुद्धी आणि वृत्ती जपणारा असतो.त्याचा कल शिक्षकाने समजावून घेतला पाहिजे.शिक्षकाने विद्यार्थ्यां मधील प्रकट अवगुण आणि सुप्त गुण हेरून त्याच्या व्यक्तीमत्वाला आकार द्यायचा असतो तेच काम गेली दशके घोरबांड गुरुजी करीत असल्याची चर्चा शिक्षण प्रेमी मध्ये आहे. समस्या असणारच,मात्र,कौशल्याने त्यांच्या मुळाशी प्रयत्न करणे आवश्यक आहे.यासाठी विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांच्यातील चांगल्या गुणांना प्रोत्साहन देणे,त्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन यात घोरबांड गुरुजींचा मोठा सहभाग असतो.

शिक्षक हवा घडणारा,आणि घडविणारा. शिक्षकांच्या विचारातील सकारात्मकता,आशावाद,मुलांना जगण्याचे बळ देतो. शिक्षकांसाठी रोजचा दिवस हा शिक्षक दिन म्हणून वावरणारे मुख्याध्यापक मन्याड खोऱ्याला लाभले हे विशेष.प्रा.मुरलीधर घोरबांड, हे एक आदर्श व्यक्तिमत्वाचा मुख्याध्यापक म्हणून श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा गुणवत्ता वाढविण्यासाठी यशस्वी प्रयत्न होईल असा आशावाद व्यक्त करत त्यांचा सन्मान संत निवृती महाराज विद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख तथा माराठवडा शिक्षक संघाचे जे.बी.शिंदे,बहुजन शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष इंग्रजी विषयाचे गुरुजी ए.व्ही.हणमंते,मनोविकासचे प्रा.विश्वामित्र घोरबाड,प्रा. कटाळे, गोविंद मोरे,भास्कर अकुलवार, ऐनोद्दीन गुरुजी,पत्रकार मुरलीधर थोटे यांनी विद्यालयात स्वागत करून अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.यावेळी शुभेच्छा देण्यासाठी सोनखेड आणि परिसरातून आलेले शिक्षक बांधवांची उपस्थिती होती.

# किनवट : नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार 'ऍक्शन मोड'मध्ये

### शहरातील समस्या तातडीने सोडविण्याच्या सूचना

किनवट । प्रतिनिधी

किनवट नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर तात्काळ प्रशासन आणि नवनियुक्त नगरसेवकांची संयुक्त बैठक घेऊन शहरातील मूलभूत समस्या सोडविण्यासाठी समन्वयाने काम करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. या बैठकीत नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार 'ऍक्शन मोड'मध्ये दिसून आल्या.

या बैठकीत शहरातील प्रत्येक प्रभागातील स्वच्छता व्यवस्था, नियमित व सुरळीत पाणीपुरवठा, सार्वजनिक दिवाबत्ती, रस्ते, नाल्यांची साफसफाई तसेच नागरिकांना मिळणाऱ्या प्रशासकीय सेवांमध्ये सुधारणा करण्यावर भर देण्यात आला. नगर परिषद प्रशासन, नगरसेवक व त्यांचे प्रतिनिधी यांच्यात योग्य समन्वय राहिल्यासच नागरिकांच्या समस्या वेळेत सुटू शकतात, असे प्रतिपादन नगराध्यक्षा सौ. येंड्रलवार यांनी केले. प्रत्येक प्रभागातील समस्या थेट प्रशासनापर्यंत त्वरित पोहोचाव्यात यासाठी नगर परिषदच्या सर्व विभागांचे दूरध्वनी क्रमांक नगरसेवक, त्यांचे प्रतिनिधी तसेच संबंधित कर्मचाऱ्यांकडे उपलब्ध असणे आवश्यक असल्याचे निर्देश त्यांनी दिले. यामुळे तक्रारींचे निराकरण जलदगतीने होऊन नागरिकांना दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तसेच, स्वच्छता कर्मचाऱ्यांची उपस्थिती, पाणीपुरवठ्यातील अनियमितता, बंद असलेली दिवाबत्ती, तसेच कार्यालयीन कामकाजातील विलंब यावर कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी संबंधित विभागप्रमुखांना जबाबदारीने काम करण्याचे आदेश दिले.

या बैठकीस मुख्याधिकारी मुंगाजी काकडे, कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, नगर परिषदचे विविध विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान नगरसेवकांनीही आपापल्या प्रभागातील समस्या मांडल्या, त्यावर नगराध्यक्षा व प्रशासनाने सकारात्मक चर्चा करत तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. नागरिकाभिमुख, पारदर्शक व गतिमान प्रशासन देण्याचा निर्धार करत सौ. सुजाता येंड्रलवार यांनी किनवट शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे, असे ठामपणे सांगितले.

# किनवट येथे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर

किनवट (प्रतिनिधी)

बेरोजगार तरुणांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणारा पोलिस अधिकारी अशी संपूर्ण महाराष्ट्रात ओळख निर्माण करणारे नांदेड जिल्हा पोलिस अधीक्षक श्री. अबिनाश कुमार यांच्या कार्यशैलीतून प्रेरणा घेत, किनवट पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी स्पर्धा परीक्षा व पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले आहे.

विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करता यावी, अभ्यासाला योग्य दिशा मिळावी तसेच मार्गदर्शन सोप्या, समजण्यासारख्या व प्रेरणादायी शैलीत मिळावे, या उद्देशाने महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. विठ्ठल कांगणे सर यांचे रोचक व परिणामकारक शैलीतील मार्गदर्शन या शिबिरामध्ये आयोजित करण्यात आले आहे. प्रा. कांगणे सर हे स्वामी विवेकानंद करिअर अकॅडमी, परभणी चे संचालक असून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन क्षेत्रात त्यांचा मोठा नावलौकिक आहे.



नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने व पोलीस स्टेशन किनवट यांच्या आयोजनाखाली हे मार्गदर्शन शिबिर रविवार, दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता, के. के. गार्डन, गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड येथे संपन्न होणार आहे. या शिबिरामध्ये पोलीस भरती प्रक्रिया, लेखी परीक्षा, शारीरिक चाचणी, अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, आत्मविश्वास वाढविण्याचे तंत्र, तसेच यशस्वी होण्यासाठी आवश्यक मानसिक तयारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या तरुणांना नोकरी मिळावी या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीत उतरवत, पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी राबवलेला हा उपक्रम पोलीस दलाच्या सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण मानले जात आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना थेट तज्ज्ञ मार्गदर्शन मिळावे, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.या कार्यक्रमात पोलीस निरीक्षक गणेश कराड हे स्वागतोत्सुक म्हणून उपस्थित राहणार असून, किनवट व परिसरातील स्पर्धा परीक्षा व पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# करण येंड्रलवार यांच्या तर्फे पत्रकार दिन साजरा

किनवट (प्रतिनिधी)

किनवट नगर परिषद सभागृहात दिनांक ०८ जानेवारी रोजी पत्रकार दिनानिमित्त नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवक व त्यांच्या प्रतिनिधींच्या वतीने स्नेहमेळावा व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान युवा नेते करण येंड्रलवार यांनी भूषविले.कार्यक्रमास पत्रकार प्रदीप वाकोडीकर, अरुण तम्मडवार, प्रमोद पोहरकर, ड. मिलिंद सर्पे, ड. कचरू जोशी, मधुकर अन्नेलवार, किरण ठाकरे, सुरेश कावळे, दुर्गादास राठोड, संतोष अनंतवार, मलिक चव्हाण, लक्ष्मीकांत मुंढे यांच्यासह विविध प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधी तसेच युट्यूब चॅनल चे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पत्रकार प्रदीप वाकोडीकर व प्रमोद पोहरकर यांनी




आपले मनोगत व्यक्त करत लोकशाहीतील पत्रकारितेचे महत्त्व, जनहितासाठी वस्तुनिष्ठ वृत्तांकनाची भूमिका तसेच प्रशासन व लोकप्रतिनिधींमधील समन्वयाबाबत विचार मांडले.

अध्यक्षीय भाषणात युवा नेते करण येंड्रलवार यांनी पत्रकारांचे समाजातील योगदान अधोरेखित करत भविष्यात नगर परिषद व पत्रकारांमध्ये सकारात्मक सहकार्य राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच कामकाजात काही त्रुटी अथवा चुका होत असतील तर पत्रकारांनी त्यावर मार्गदर्शन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.या कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेतेपदी नगरसेवक अभय नगराळे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार मारोती मुनेश्वर यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच पत्रकारांना नवनियुक्त नगरसेवक व त्यांच्या प्रतिनिधींची औपचारिक ओळख करून देण्यात आली.कार्यक्रमास नगरसेवक प्रवीण राठोड, अभय महाजन, हसन लाला खान, चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार, राम नेम्मानिवार, शेख अली, अन्वर मिर्झा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.नाश्ता व चहापानानंतर युवा नेते करण येंड्रलवार यांच्या हस्ते पत्रकारांना पेन व डायरी भेटवस्तू स्वरूपात देण्यात आल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड. येऊतकर यांनी केले तर आभारप्रदर्शन राजेश जोशी यांनी केले. यावेळी साहिल सिरमनवार, शिवा तिरमनवार, साई तिरमनवार, गोलू माडपेल्लीवार, अनिल कोटिलवार यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. संपूर्ण कार्यक्रम सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडला.